# करुणेचा कलाम

बाबा आमटे



म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. 2592

REFBK-0024354
REFBK-0024354

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र.
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

संदर्भ काव्य
2492
28348
१५।१०।८४

वसुधा प्रकाशन

वसुधा
प्रकाशन
:
१७

॥ चिंतन : बाबा आमटे
शब्दांकन : सुरेश द्वादशीवार ॥

REFBK-0024354
REFBK-0024354





■
प्रकाशक
वसंत लुले
वसुधा प्रकाशन,
जोशीवाडी,
सीताबर्डी,
नागपूर १२
■
प्रथमावृत्ती :
जून / १९८४
■
प्रकाशन क्र.
१७
■
© वसुधा प्रकाशन

■
मुद्रक :
मधुसूदन पां. बनहट्टी
नारायण मुद्रणालय,
धनतोली,
नागपूर १२

■
मुखपृष्ठ / रेखाचित्रे :
सुभाष अवचट
पुणे.

■
मांडणी :
संजय धोतरकर
नागपूर.

■
मुद्रण प्रत :
वामन तेलंग
नागपूर.

■
मूल्य :
२० रुपये

■

पूर्वप्रसिद्धी :
तरुण भारत,
मराठवाडा,
चर्चा,
मुंबई सकाळ,
युगवाणी,
लोकमत.
इ.

ज्यांची स्वप्ने अजून क्षितिजांवरच
राहिली आहेत. .

॥ करुणेचा कलाम : बाबा आमटे ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2592
दा. क्र. 23354
का. 99 ४८ /दे
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

# "आम्ही बिघडलो तुम्ही बिघडाना"

**पु. ल. देशपांडे**

शहाण्यानी बाबा आमटयांचा हा 'करुणेचा कलाम' वाचू नये, अशी माझी धोक्याची सूचना आहे. एखाद्या कवितासंग्रहाला सुरुवातीचे चार शब्द लिहिताना असल्या शेऱ्यांनी आरंभ करणं हे शहाणपणाचं लक्षण नव्हे हे मला माहिती आहे. पण सत्याचं दर्शन ही एक महान तापदायक गोष्ट आहे. करुणेचा कलाम काय किंवा ज्वाला आणि फुले काय त्यातल्या ओळी अप्रिय सत्याचा चटका केव्हा देऊन जातील ते सांगता येत नाही. साधा 'करुणा' हा शब्दच पहा. करुणा म्हटलं की डोळे गाळणं आलं. पण इथे 'करुणा' डोळे गाळायचा निरोप सांगत येत नाही. उलट नुसत्या गळणाऱ्या डोळयांनी जीवनातल्या यातनांकडे पाहून विव्हळ झाल्याच्या समाधानात स्वतःला धन्य मानण्यात फारसा अर्थ नाही, असंच बजावीत आलेली ही कविता आहे. कृतीला प्रेरक ठरली नाही तर त्या करुणेला काही अर्थ नसतो.

**कर्माच्या रिकाम्या जागा ते भरतात**
**पोकळ शब्दांनी**
**क्रियांशी त्यांचा संबंध नसतो**
**ते फक्त प्रतिक्रियाच व्यक्त करू शकतात.**

अशासारख्या ओळी आपल्याला आपल्याकडेच नीट पारखून बघायला लावतात. आपल्यातलं इतरांच्या वेदना हलक्या करायला कामी येणारं सोनं किती आणि पोकळ अहंकाराचं हीण किती याची तपासणी करायला लावतात. ह्या आत्म-परीक्षेत पास होण्यापेक्षा नापास होण्याचीच शक्यता अधिक. त्यामुळे ह्या परीक्षेला न बसणेच चांगले. आणि ही कविता वाचता वाचता आपण आपली स्वतःची परीक्षा केव्हा घ्यायला लागलो ते लक्षातही येत नाही; म्हणून ती धोकेबाज आहे. **'कोणाच्या पायाचा काही असो गुण । आपुली आपण विडी प्यावी ।।'** ह्या धोरणानी जगण्याला शहाणपणाचं जगणं मानलं जातं. मग जगणारे जमदग्नी प्रेतरूप असले

तरी हरकत नाही. अशा, व्यवहारी सुबक प्रकारचं जगण्याचं सुख भोगणाऱ्यांना, उगीचंच त्रासात लोटणारी ही कविता आहे.

कारण बाबा आमटे आणि कविता यांचं नातंच निराळं आहे. दिवसभराच्या रामरगाड्यानंतर मनोविनोदनार्थ घातलेली शीळ असावी अशा स्वरूपाचं हे नातं असतं तर त्यांच्या शब्दप्रभुत्वामुळे आपल्याला 'क्या बात है, बहुत अच्छा–सुभान अल्ला' म्हणायला लावणाऱ्या ओळींच्या कारंज्यात भिजायला मझा आला असता. पुन्हा एकदा आपुली विडी पेटवायला आपण मोकळे. पण बाबा साधं गुलाबाचं रोप लावतानाही, न जाणे एखादं आंधळं पोर त्या रोपापाशी वासाच्या लोभानी गेलं तर त्याच्या डोळ्यांना न दिसलेल्या काट्यांनी रक्तबंबाळ होईल म्हणून, बिनकाट्याच्या गुलाबाचा शोध सुरू करतात. जंग जंग पछाडून तसला कंटकहीन गुलाब मिळवतात. गुलाबाच्या बगीच्यासारख्या सौंदर्याच्या साधनेत देखील ज्यांची यातनामय जीवन जगणाऱ्यांच्या बाबतीतली संवेदना बोथट होऊ शकत नाही त्यांना कुठलीही गोष्ट केवळ मनोरंजन, केवळ विरंगुळा, केवळ सुखासीन पळवाट म्हणून करताच येत नाही. स्वतःच्या देशासाठी युद्धात मरण पावलेल्या अनामिक सैनिकाचं स्मारक करावं तसं बाबा माणसांच्या कामी येण्यासाठी स्वतःला चिरून घेणाऱ्या वृक्षांच्या स्मरणार्थ हुतात्मा वृक्षाचंही स्मारक करतात आणि त्या अज्ञात सोयऱ्या वृक्षाच्या स्मारकावर पुष्पचक्र वाहतात. असल्या जगावेगळ्या एकात्म आणि तितक्याच मनस्वी वृत्तीनी जगणाऱ्या माणसाला शब्दासारखी प्रचंड शक्ती केवळ फुलबाज्या उडवल्यासारखी वापरता येणारच नाही. झडलेल्या बोटांच्या नुसत्या उरलेल्या पंजात निर्मितीची शक्ती उत्पन्न करणारे बाबा आजच्या जगात महारोग्याच्या अवयवासारख्याच संज्ञाशून्य झालेल्या शब्दांना निराळ्या चैतन्यानी फुलवतात. जिवंत करतात. असले हे थडग्यातून पुनरुत्थान झाल्यासारखे भासणारे शब्द वर्तमानाचं आणि तसल्या त्या वर्तमानात वावरणाऱ्या माणसांचं आणि प्रवृत्तींचं असं काही भेदक दर्शन घडवतात की ही कविता वाचण्यापूर्वीचे आपण आणि नंतरचे आपण ह्यात विलक्षण फरक पडतो. तो टिकून राहातो की नाही हा प्रश्न निराळा. पण त्या ओळी जखमा करून गेल्याशिवाय राहात नाहीत. आणि एखादी घटना अशी घडते की अकल्पितपणानी त्या जखमेतलं ओलेपण टिकून राहिल्याचीही जाणीव होते. ह्या शब्दांना ज्यांनी ते वापरले त्यांनी आपल्या जीवनाचीच जी मशाल पेटवली आहे त्या मशालीतूनच लाभलेली दाहकता आहे. ही दाहक अग्निफुलं आहेत.

याचं कारण बाबांचं जीवन आणि बाबांची कविता ह्यात विलक्षण एकात्मता आहे हे आहे. तसं नसतं तर ती एक केवळ चतुर शब्दलीला झाली असती. उक्ती आणि कृती यात जर संपृक्तता नसली तर ते शब्द—"**उडवीत येतात शितोडे**

**उपदेशाचे । भरल्या पोटी पान खाऊन टाकलेल्या भडक पिचकारी सारखे । समाधानपूर्वक "** असे असतात.

माझे जीवन हीच माझी वाणी असं एखादा महात्मा किंवा एखादा रवीन्द्रनाथ म्हणू शकतो. करुणेचा कलाम-कलाम म्हणजेही वाणीच-ही देखील संपूर्णपणानी समर्पित आणि भयशून्य जीवन जगणाऱ्या बाबा आमट्यांची मंत्रसदृश वाणी आहे. आमार जीबन आमार बाणी म्हणायचा त्यांना अधिकार आहे. मंत्रसदृश म्हणायचं एक कारण आहे. मंत्राचा जन्म तपोधन ऋषीच्या मुखातून अचानक होतो. म्हणून ऋषींना मंत्र दिसला म्हणतात. सहजता हे मंत्राचे व्यवच्छेदक लक्षण आहे. ज्या अंतःकरणातून तो उमटतो ते अंतःकरण मात्र तपःपूत असावे लागते. 'ज्वाला आणि फुले' हा बाबाचा संग्रह प्रसिद्ध झाल्यावर तो काव्यावतारही एकदम निराळा, आशय आणि अभिव्यक्ती ह्या दोन्ही दृष्टीनी नवा, त्यातले शब्दही विशुद्ध चैतन्यानी नहालेले असेच वाटले होते. त्या कवितांना वि. स. खांडेकरांनी 'लोकविलक्षण आत्म्याचे उर्जस्वल शब्दविलसित' असे म्हटले होते. त्यातला शब्दविलसित हा शब्दप्रयोग अतिशय लक्षणीय आहे. ह्या विलसितामुळे जीवनातल्या विपरीत, यातनामय अनुभवातून स्फुरणाऱ्या विचारांच्या कविता झाल्या. त्या आशयाचे तात्त्विक निबंधही होऊ शकले असते, पण तसे झाले नाही; कारण बाबांच्यातल्या विधायक कार्यकर्त्यांनी त्यांच्यातल्या सौंदर्यलक्ष्यी कवीचा खातमा केला नाही. किंबहुना ह्या दोन्ही भूमिकातील ह्या दोन प्रवाहांच्या संगमातून एक नवाच कविता-प्रवाह निर्माण झाला आहे. विधायक कार्यकर्ता आणि कवी अशा दोन भूमिका संपूर्णपणानी अलग ठेवून विचार करण्याकडे साहित्यातल्या बऱ्याच समीक्षकांचा कल आहे. वास्तविक अशी टोकाची भूमिका घेऊन एकाच व्यक्तीत नांदणाऱ्या ह्या दोन प्रवृत्तींना निराळे ठेवण्यात सुज्ञपणा मानायचं कारण नाही. कवीश्वर हा शब्दसृष्टीचा ईश्वर असला म्हणजे झालं; बाकीच्या जीवनात तो कसा का असेना त्याच्याशी वाचकाचा संबंध नाही अशी एक भूमिका घेतली जाते. त्याबरोबर विधायक कार्यकर्ता म्हणून तो श्रेष्ठ असल्यामुळे त्याची कलानिर्मितीही श्रेष्ठ मानायला हवी असा आग्रह धरणारांचाही एक पंथ आहे. तुमच्या कलेतून लोकशिक्षण, धर्मप्रसार, किंवा एखाद्या राजकीय तत्त्वज्ञानाचा प्रसार, उपदेश ह्यासारखं काही होत नसेल तर तुम्ही शब्दांचे बेगडी कागद घेऊन नुसती चकचकणारी जिनगरी कारागिरी करणारे आहात-सच्चे कलावंतच नव्हेत, असाही सूर उमटत असतो. अशा वेळी शुद्ध कलावादी लोक कलेत प्रचार झाला की दूध नासावे तशी कला नासते असे मानतात. बाबा मात्र, आपली कविता आपल्या अनुभूतीशी इमान ठेवून प्रकट करीत असतात. तिला कोणी प्रचारवादी, चर्चावादी-उपदेशवादी म्हणेल याची त्यांना भीती वाटत नाही किंवा एखाद्या सुंदर अलंकारासारखा शोभणारा शब्दांचा

मजेदार खेळ करतानाही ते चाचरत नाहीत. त्यांच्या प्रतिभेची जातकुळी रवीन्द्र-नाथांच्या ‘निर्झरेर स्वप्नभंग’मधल्या बांध तोडून खळाळत सुटलेल्या त्या निर्झराची आहे. ती उघडया डोळयानी वास्तव पाहाते आणि बेभान होऊन त्या वास्तवाला प्रवाही शब्दचित्रातून प्रकट करते. त्यांच्या सात्विक प्रवृत्तीनी एकदा त्यांना अस्वस्थ केलं की त्या टोचणीतून स्फुरलेली कृती त्यांना हातचं राखून, व्यवहारी समंजसपणानी कधी करता आलीच नाही. हे व्यवहारी शहाणपण त्यांच्यात नाही. जवानीत त्यांची ही वृत्ती त्यांना जंगलातल्या वाघांकडे ओढून नेत होती. मोटारींच्या जीवघेण्या शर्यतीत भाग घ्यायला लावीत होती. पण एक दिव्य क्षण त्यांच्या जीवनात आला. आध्यात्मिक परिभाषेत त्याला कोणी साक्षात्कार म्हणेल. देव दिसल्याच्या भासाबद्दलही सांगेल. पण बाबांना मात्र आपल्याला ‘क्षितिज नसलेले पंख’ लाभले असल्याची जाणीव झाली. ज्या क्षणी नियतीनी त्यांच्या पुढयात परीक्षेतल्या प्रश्नपत्रिकेसारखा तो गटारात रुतलेला महारोगी आणून टाकला आणि वाघाला न भिणारा म्हणवतोस तर ‘ह्याला भितोस की नाही ते सांग’ असा प्रश्न केला आणि त्या महारोग्याला ज्या क्षणी बाबांनी आपल्या वेंघेत घेतला त्या क्षणी त्यांना जो केवळ मृत्युंजयांनाच होतो तो साक्षात्कार झाला आणि सार्थ आत्मविश्वासातून त्यांचा कलाम उमटला—

**आता मला कापरे भरत नाही**
**कारण माझ्यातला सागर सतत गर्जना करीतच असतो**
**भरती आणि ओहोटी यांनी तो विचलित होत नाही**
**कारण भरती ही जर माझी कृती आहे**
**तर ओहोटी ही विकृती कशी म्हणता येईल ?**
**भरतीच्या लाटांनी मी जीवनाला आलिंगन देतो**
**आणि ओहोटीच्या हातानी त्याचा पदस्पर्श करतो**
**आणि निबिडातल्या एकान्तसाधनेत पूर्ववत् गढून जातो.**

(ज्वाला आणि फुले पृ. ४७)

जीवनालाच नव्हे तर मरणालाही आलिंगन देण्याचा प्रसंग आला असताना विचलित न होणारा हा कवी. माणसांच्या गर्दीत राहून विधायक कार्याचे डोंगर उपसत असताना त्याची निबिडातली एकान्तसाधना चालूच असते. ती त्यांना आवश्यक आहे. समर्थांनीही ‘काही एकान्त काही गलबला’ सेवीतच पुरुषार्थी माणसाचं आयुष्य जायला हवं असं म्हटलं आहे. कलावंत बाबा आमटे ह्यांच्या त्या निबिडातल्या एकान्तसाधनेचं कविता हे फलित आहे. त्या मनोनिर्मित गुहेतून बाबा बाहेर पडतात ते ओठावर जीवनातल्या काही नव्या साक्षात्कारांनी भारलेल्या मंत्रासारख्या शब्दपंक्ती घेऊन. बहुधा त्या इंग्रजीत असतात. हे मला

एक गूढच आहे. त्यांच्या मनात कल्पनांचा जो कल्लोळ उडालेला असतो त्या कल्लोळाच्या अरूपाला पहिले शब्दरूप लाभते ते इंग्रजी. त्यासाठी त्यांनी काही त्या भाषेची खास उपासना केली आहे किंवा त्या भाषेवर त्यांचा आंधळा लोभ आहे असेही नाही. त्यांच्या अतिशय धकाधकीच्या जीवनातही प्रसंगी अखंडित चाललेल्या वाचनात इंग्रजी विज्ञानविषयक आणि ललित ग्रंथ अधिक येतात एवढेच. ज्या महारोगाशी त्यांनी महायुद्ध चालवलेलं आहे त्या आणि इतर वैद्यकविषयावर किंवा कृतिविषयावर अत्याधुनिक संशोधनाची माहिती देणारे ग्रंथ इंग्रजीतूनच अधिक लिहिले गेले आहेत. इंग्रजी आणि युरोपीय ललित आणि तत्त्वज्ञानविषयक ग्रंथ लिहिणाऱ्या दिग्गजांशी त्यांनी त्या ग्रंथातून इंग्रजीतूनच संवाद साधलेला आहे. इंग्रजीबद्दल त्यांच्या मनात परभाव राहिलेला नाही. मराठी किंवा वऱ्हाडी इतकीच ती त्यांची भाषा होऊन त्यांच्या मनात नांदते आणि तिथे होणाऱ्या स्पंदनांचा आविष्कार इंग्रजीतून प्रथम प्रकटतो. तो इंग्रजीतून प्रगटल्याची परकेपणाची लेशमात्र जाणीव त्यांच्या मनात नसते. त्या इंग्रजी शब्दपंक्ती मराठीतून आणणं हे त्या मूळ शब्दांना परकायाप्रवेश करायला लावण्यासारखंच आहे. सुरेश द्वादशीवारांनी ते कार्य खूप समरस होऊन केलं आहे. मी ह्यातल्या काही कवितांचं मूळ इंग्रजी स्वरूप पाहिलेलं आहे. गायकाच्या गळ्यातले सूर सारंगियानी आपल्या तंतातून तंतोतंत काढावे तसे हे मूळ इंग्रजी कवित्व सुरेशनी मराठी साजातून प्रकट केलं आहे.

बाबांच्या शब्दातलं सौंदर्य आणि ह्या कवितेतल्या आशयाला त्यांच्या समर्पित जीवनाचं तारण असल्यामुळे त्या शब्दांना लाभलेलं चैतन्य, मराठी अवतारातून प्रत्ययाला आणून देणं हे कार्य सोपं नव्हतं. पण सुरेशनी बाबांची फक्त मूळ कविताच पाहिलेली नाही; त्यांचं जीवनही खूप जवळून न्याहाळलेलं आहे. बाबा जेव्हा आपल्या 'तृप्त जखमांच्या समृद्ध संस्काराची' कविता करतात तेव्हा त्या जखमा आणि ते संस्कार सुरेशच्याही लेखी केवळ शब्द राहात नाहीत. सतत डोक्यात फिरत असलेल्या विचारचक्राचं आचारात रूपान्तर होत असताना सुरेशनी ती रूपांतरं प्रत्यक्ष पाहिलेली आहेत. एक प्रकारच्या कृतिशील साक्षित्वामुळे बाबांच्या कवितेतला प्राण, मूळ इंग्रजी उद्‌गारातून निघालेली ही कविता मराठीतून यतानाही, शाबूत राहिलेला आहे. आधुनिक शल्यविशारद एका हृदयाच्या जागी दुसऱ्या हृदयाचं रोपण करतात तसं इंग्रजी भाषा–हृदयाच्या जागी मराठीतून ठोके देणारं मराठी–भाषारोपण सुरेशनी यशस्वी रीतीनी केलं आहे. हे नुसतं ट्रान्सलेशन न होता ट्रान्सप्लँटेशन झालं आहे.

ह्या कवितांतली ओळन् ओळ बाबा आमटे नावाच्या माणसाच्या श्वासोच्छ्‌वासासारखी त्याच्या व्यक्तिमत्त्वातून निर्माण झाली आहे. जे स्वतः भोगलं,

आपल्या स्वतःच्या विचारचक्रावर कुंभाराच्या चाकासारखं जे घुमवलं त्यातून निर्माण झालेली ही कविता आहे. जीझसच्या सेवाखोर हातांबद्दल ते जेव्हा लिहितात तेव्हा त्यांचे हातही असेच सेवाखोर आहेत याची आपल्याला आठवण होते. त्यांनीही त्या सेवाखोर हातात महारोग्यांचे हात घट्ट धरून त्यांच्यात नवा विश्वास जागवला आहे, हे आपण विसरू शकत नाही. करुणानिधान ख्रिस्त बाबांना सतत पालवीत आलेला आहे. रुग्णांच्या जखमा प्रेमानी धुणारे हात जेव्हा त्यांना दिसतात, डोळ्यासारख्या नाजुक इंद्रियांवर, त्या रुग्णांना 'डोळ्यांचे सूर्य लाभावे' ह्या एकाच उदात्त भावनेनी प्रेरित झालेले एखाद्या कर्मयोगी शल्यविशारदाचे हात जेव्हा चालताना ते पाहातात तेव्हा किंवा

**राष्ट्रांच्या अन् धर्माच्या क्षितिजापल्याड जातो करुणेचा स्पर्श**
**आणि जेव्हा सत्तामत्तांपुढे उभे होते निःशस्त्र आव्हान–**

तेव्हा, ही सारी स्थानं त्याना ख्रिस्तमय झालेली दिसतात. त्याबरोबरच अंगुष्ठमात्र माणसं साक्षात् प्रेषिताला आणि परमेश्वराला स्वार्थासाठी बंदिस्त करून ख्रिश्चानिटीची चर्चानिटी करून पुष्ट व्हायला लागतात तेव्हा ते त्या धर्माच्या दलालांवर तुटून पडतात. जी करुणा 'स्व'ला विसरून वेदना नष्ट करायला धावून जात नाही त्या अकर्मक करुणाभावनेला त्यांच्या लेखी किंमत नाही. म्हणून वेदनांचे वेद म्हणणारी त्यांची कविता एक ठाम प्रयोजन घेऊन उभी राहाते. असली कविता जीवनाला सामोरे जायला उद्युक्त करणारी प्रेरक शक्ती होते. ती नुसती विविध अनुभूतींची सुंदर शब्दात मांडलेली चित्रप्रदर्शिनी होत नाही. असली कविता एक जाणतेपण घेऊन येते. तिला प्रौढत्वाचं सौंदर्य लाभलेलं असतं. जीवनातल्या विरूपावर ती ज्या आवेशात तुटून पडते तो आवेश देखील विजेचं सौंदर्य दाखवीत प्रकटतो. कधी ती जीवनाच्या भाष्यकाराच्या भूमिकेतून येते. अशाच एका कवितेनी सानगुरुजींच्या अश्रूंची, "तुझ्या आसवाना चिरंतनाचा स्पर्श होता" अशासारख्या ओळीनी निराळीच ओळख करून दिली आहे. सानेगुरुजींच्या जीवनावर झोत टाकल्यासारखी त्यांची 'अश्रूंच्या नोंदी' ही कविता आहे.

**पंढरपूरचा बंदिस्त परमेश्वर सोडवायला**
**प्राणांची बाजी लावलीस तेव्हा**
**मेणाहून मऊ असणारं संतत्व**
**आम्ही पाहिलं वज्राहून कठोर झालेलं**
**आपल्या विवेकाच्या स्पंदनात हरवलेला तू**
**आपल्या श्रद्धेचा, त्या महात्म्याचाही**
**आवाज ऐकायला तयार नव्हतास**
**तेव्हाची तुझी उद्दाम माणुसकी**

होती सैतानाच्या जिद्दीहूनही दाहक अन्
परमेश्वराच्या कृपेहूनही मोहक.

ह्या ओळी वाचताना पंढरपूरच्या मंदिरप्रवेशाच्या चळवळीच्या काळातले मी पाहिलेले, सात्विक संतापानी ज्वालेसारखे तळपणारे, सानेगुरुजी पुन्हा एकदा माझ्या डोळ्यापुढे जिवंत झाले. ख्रिस्त, गांधी, सानेगुरुजी, विनोबा ही बाबांची प्रेरणास्थानं. ख्रिस्त आणि गांधीत तर त्यांना अद्वैतच दिसतं.

गांधीच्याही तळहातावरच्या क्रुसावरील खिळयांच्या खुणा
अन् ख्रिस्ताच्या छातीवरचे पिस्तुलाचे डाग
मी पाहू शकतो अद्वैत.

ख्रिस्ताच्या जीवनात आलेली मेरी मागडालिन किंवा उज्जैनची आम्रपाली ह्या वारयोषितांची कहाणी आठवताना बाबा चटकन् म्हणतात—

अज्ञात बापांच्या पापांची लेकरं कुशीत घेऊन
असाच एक थवा आला होता
चेहऱ्यावर दुसऱ्यांच्या अपराधांचे ओझे मिरवणारा
मी म्हटले—"तुम्ही जीवन जन्माला घातले आहे;
माझ्या लेखी तुमचेही मातृत्व वंदनीय आहे
देवकी–यशोदेशारखे."
त्यातल्या एकीने निरोपाचे ओठ उमटवले
पायाच्या अंगठ्यावर
तेव्हाच्या तिच्या अमर्त्य नमस्काराचे
मी मर्त्य निमित्त होतो.

ह्या ओळी वाचतानाही प्रत्यक्षात घडलेला तो प्रसंग मला पुन्हा दिसायला लागला. आपल्यासारख्या वेश्येतलं मातृत्व मला माझ्या आईच्या मातृत्वाइतकंच वंदनीय आहे असं बाबांनी म्हटल्याबरोबर आश्रमात ठेवलेली वेश्यांची मुलं परत मागायला आलेल्या त्या कुंटिणींनी बाबांच्या पायाच्या अंगठ्याचं चुंबन घेतलं होतं आणि त्यांची पावलं खरोखरीच आसवांनी धुतली होती. हा प्रसंग आता कविता होऊन काळाच्याच भिंतीवरचं लेणे होऊन चिरंजीव झाला आहे. ज्यांच्या आयुष्यातला प्रत्येक दिवस अशी नानाप्रकारची नवी आव्हानं देत उगवतो, जीवनात दुःखांच्या दरीत कडेलोट झाल्यासारखी कोसळलेली माणसं ज्यांच्या उंबरठ्यावर नित्य नव्यानी येत असतात, अशा माणसांच्या अनुभवांची कविता हा नुसताच साहित्यकलेतला सुंदर आविष्कार राहात नाही. ते साहित्याचं लेणं असतंच पण असं लेणं होऊन राहण्याचा हेतू त्याच्या जन्मकाळी कुणी मनात ठेवलेला नसतो. तुकोबाची गाथा किंवा ज्ञानदेवांची ज्ञानेश्वरी ही जशी केवळ

मराठी भाषेचे वैभव वाढवणारी रचना म्हणून पाहायची नसते. किंबहुना त्यांच्या जन्मदात्यांनी साहित्यात असण्यानसण्याचा विचारही कधी केलेला नव्हता. ह्या काव्यसंग्रहाचाही तोच प्रकार आहे. वाल्मिकीच्या शोकाचा श्लोक झाला. बाबांच्या मनाला जाऊन जे भिडलं ते कविता होऊन प्रकटलं. त्यांच्या मनात विचारचक्राची भ्रमन्ती सुरू झाली की त्या विचारांचे आचारांप्रमाणे उच्चारातही रूपान्तर केल्याशिवाय त्यांना राहवत नाही. मनातला क्षोभ कवितेतून प्रकट होताना बाबांचं एक तापहीन मार्तंडासारखं दर्शन असतं. ह्या क्षोभाला कुठल्याही स्वार्थाची, वैयक्तिक कुरकुरीची बैठक नसते. ज्या विनोबांच्या विषयी त्यांच्या मनात अपार आदर, ज्यांचा हात पाठीवरून फिरल्यावर वेदनाही धन्य झाल्या असं त्यांना वाटलं होतं त्यांना—

**सहभागाच्या संकेताची मुकी मागणी डोळयात घेऊन**
**सारा देश तुझ्या दाराशी आला तेव्हा**
**संतांचा सहभागी आम्ही ओशरता पाहिला**
**बघ्यांच्या पळवाटेवर !**

अशा अवस्थेत पाहिल्याचं दुःखही ते वास्तवाला झाकायचा खटाटोप न करता कवितेतून व्यक्त करतात.

**शस्त्रास्त्रांच्या साठ्यावर स्वार झालेले**
**रीगन्स अन् ब्रेझनेव्हज् नुसते नेतेच नाहीत**
**माणसांच्या सामूहिक मरणांचे मक्तेदारही आहेत**
**कधी तरी किंचाळतात ते कल्याणाचे कार्यक्रम**
**हाडांच्या व्यापाऱ्याने भूतदया सांगावी तसे**

अशासारख्या ओळी सोयीस्कर रीतीनी विसरायला किंवा डोळेझाक करायला सरावलेल्या तुमचे आमचे वास्तवाचे भान जागवून जातात. सूडाच्या तत्त्वज्ञानाला ब्रह्मवाक्य मानून प्राणघातक शस्त्रास्त्रांची ही प्रचंड निर्मिती कशासाठी ? ह्या प्रश्नाचं उत्तर सापडण्यापूर्वी कदाचित् मानव नावाचा प्राणीच, ह्या पृथ्वीवरच्या घाउक मरणाच्या मक्तेदारांच्या कर्तृत्वानी नाहीसाही झालेला असेल हा विचार आपल्याला हादरून टाकतो. बाबांनी माणसाला 'कल्चर बिल्डिंग ॲनिमल' म्हटलेलं आहे. सुंदर निर्मिती करायची देणगी निसर्गानी माणसाला दिली आहे. आणि हा माणूस जेव्हा विध्वंसाची शस्त्रास्त्र निर्माण करण्यात आपली बुद्धी आणि अफाट धन खर्च करायला लागतो त्यावेळी हा सारा जगण्याचा खेळच अर्थशून्य वाटायला लागतो. ही भावना नाहीशी करून जीवनाला अर्थपूर्ण करणं हे महत्त्वाचं. आणि जीवन म्हणजे आपापल्या डबक्यात वैयक्तिक किंवा क्षुद्र गटांचे अहंकार पोसत कुणाचा तरी द्वेष करीत जगणे नव्हे. डबक्यातले हे असले जगणे केवळ 'भय'

हा स्थायीभाव असणाऱ्या जनावराचे जगणे झाले. माणसाचे नव्हे. पण डबक्यातले जगणे सोयीस्करही वाटायला लागते. ह्या भयभीत जगण्याचा **मर्ढेकरांनी 'सह नौ ऽवतु'** हा अर्थ आहे असे म्हटले आहे. बाबा म्हणतात—

**समुद्र स्वीकारण्याहून आपल्या डबक्यानाच**
**समुद्र मानणे**
**हे अधिक सोपे आहे**
**खुज्या माणसानी आपल्या डबक्याना**
**समुद्राची नावे दिली**
**धर्म, वंश, वर्ण, जाती, पोटजाती, भाषा, प्रांत**
**अन् अद्वैताचा महासागर हटवून टाकला.**

पण अद्वैताच्या महासागरातली सफर सोपी नसते. माणूस, माणुसकी, मानवधर्म वगैरे अद्वैतदर्शक शब्द जपताना मनुष्यरूपी शार्क माश्यांचीही ह्या सफरीत दखल ठेवावी लागते. हे शार्क मासे मानवधर्म सांगणाऱ्या, देवाची जागा करुणेला लाभावी यासाठी जीव पाखडणाऱ्या ख्रिस्तांना, गांधींना आणि मार्टिन ल्यूथर किंग सारख्यांना ज्या मारेकऱ्यांच्या रूपानी ग्रासायला आले तसेच येतील असं नाही. त्यांची रूपं अनेक आहेत.

**अन्नाचे साठेबाज नुसते धान्याचे साठे**
**दडवीत नाहीत**
**गरीब माणसांच्या मरणांचे साठे जमा करतात**
**स्वार्थी माणसांच्या हाती जीवन**
**असे मरण होते**

माणसातल्या ह्या प्राणीसुलभ स्वार्थी हिंस्रतेविरुद्ध आणि स्वार्थनिरपेक्ष जीवनाबद्दल लिहिणारे बाबा आमटे हे काही पहिले कवी आहेत असं नाही. पण माणसाच्या हीन, स्वार्थी जीवनावर हल्ला करायचा अधिकार मात्र बाबा आमट्यांसारख्या एखाद्याच माणसाला मिळालेला असतो आणि म्हणूनच

**नुसता निषेध नपुंसक असतो**
**विधायक कार्याच्या उपासनेतून निषेधाची ताकद वाढत असते**
**रचनेवाचून होणारी क्रांती हे विनाशाला निमंत्रण असते**
**आणि रचनेच्या कार्यक्रमाला क्रांतीच्या बिरुदाची गरज नसते**

असं जेव्हा बाबांसारखं जीवन जगणारा कवी म्हणतो त्यावेळी त्या ओळीतून सत्याचा घंटानाद ऐकू येतो. 'करुणेचा कलाम' हा असाच एक घंटानाद आहे. अचानक कानावर येणारा घंटानाद माणसाला अस्वस्थ करतो. मग तो आगीच्या बंबाचा असो की देवळातल्या आरतीचा असो. बाबांच्या कवितेतली

ओळ न ओळ ह्या घंटानादासारखी खणखणत आलेली आहे. ज्यांनी जीवनाच्या यज्ञात स्वतःला समिधेसारखं झोकून दिलं त्यांची त्यांनी त्या कवितांनी पूजा केली आहे. त्या पूजेच्या निमित्तानं झालेला हा घंटानाद म्हणा हवं तर ! ख्रिस्त, गांधी, सानेगुरुजी, विनोबा ह्या महाभागांना बाबा विसरू शकत नाहीत. कारण त्यांच्या जीवनातल्या अंधाऱ्या क्षणी ते मशाल होऊन आलेले आहेत. रवीन्द्रनाथांच्या शब्दात सांगायचं म्हणजे 'जीवन सुकून गेलेल्या क्षणी करुणाधारा होऊन' त्यांच्यावर त्यानी वर्षाव केलेला आहे. म्हणूनच ते म्हणतात—

**मोती उधळताना सोबतीला आले त्यांना विसरणं शक्य आहे**
**अश्रू गाळताना साथीला होते त्यांना कसे विसरायचे ?**
**पाण्याहून रक्ताचे नाते दाट असेल**
**पण अश्रूंचे नाते त्याहून घनदाट आहे.**

असंख्य अभाग्यांचे अश्रू ज्या हातानी पुसले गेले आहेत, किळस आणणाऱ्या अनेक जखमा ज्या हळुवार हातानी धुतल्या गेल्या आहेत, त्या हाताशी जुळलेल्या अंतःकरणातून उमटलेली ही वाणी आहे. तपोधन ऋषींच्या मुखातून उमटणाऱ्या उपनिषदातल्या मंत्रांसारखं हे आनंदवनात जन्माला आलेलं करुणोपनिषद् आहे. ते मनाला एका निराळ्या प्रकारची जाग आणतं. आता असं जागं राहून जगणं हे आपल्याला झेपणारे आहे की नाही याचा ज्यांनी त्यांनी विचार करावा. मात्र असं जगता आलं तर मनुष्यजन्माला आल्याचं सार्थक झालं असं वाटेल एवढा जरी विचाराचा थेंब आपल्या मनाच्या गढूळलेल्या पात्रात पडला तरी त्या क्षणाची आठवण जीवन सार्थ करायची ओढ मनाला लावीत राहील. ही अस्वस्थता आत्मसंतुष्टतेतून लाभणाऱ्या स्वस्थतेहून कितीतरी पटीनी अधिक मोलाची आहे. बाबांच्याच कवितेचा आधार घेऊन सांगायचं म्हणजे—

**सत्ताधाऱ्यांना विसर पडतो**
**ते समाजाचा चेहरा बदलण्याच्या प्रयत्नात असतात**
**संतांना विसरता येत नाही**
**ते समाजाचं मन बदलण्याचा प्रयत्न करतात.**

ज्यासि आपंगिता नाही त्याला हृदयी धरणाऱ्या बाबा आमट्यांची कविता देखील संतांचं, समाजाचं मन बदलण्याचंच प्रयोजन घेऊन जन्माला आलेली आहे. रंजनापेक्षा अंजनाचं कार्य करणारी आहे. तुकोबांनी म्हटल्याप्रमाणे बाबा आमट्यांचं हे करुणोपनिषद देखील 'आम्ही बिघडलो तुम्ही बिघडाना' म्हणत प्रकट झालं आहे. तुकोबांना जे बिघडणं अभिप्रेत होतं त्याप्रमाणे वाचकाला बिघडवण्याचं काम ही कविता केल्याशिवाय राहणार नाही याची मला खात्री आहे; म्हणून मी सुरवातीचा धोक्याचा इशारा दिलेला आहे. ■ ■

## समर्पणाच्या कुशीत ये

चंदेरी ताऱ्याच्या प्रकाशात
तू पुन्हा जन्म घेणारच असलास तर
हे आकाशपुत्रा,
रुपेरी हिमशिखरांनी जिची शीर्षरेखा सजवली आहे
अन् जिच्या निमूळत्या पायथ्याशी महासागराचे संगम
आश्रयाला आले आहेत
त्या पुण्यभूमीत तू ये.

तुझ्या पावलांखाली हिरव्या वनराजींच्या मखमली पायघड्या
आम्ही घालू,
अज्ञातात रुतलेले चैतन्याचे पवाडे तुझ्यासाठी गाऊ
अन् आमच्या विद्ध पावलांवर तुझ्यासाठी नृत्याचे सोहळे सजवू.

महारोगाच्या शापानं कृतिशील बनवलेले पांगळे हात
तुझ्या पाळण्याची वीण धरतील
तू बघ,
अंधार उजळून टाकणाऱ्या दीपज्योतींसारखी लख्ख मनं
तुझ्या स्नेहस्वागतासाठी उभी असतील,
दु:ख जगणारांच्या आनंदाश्रूंचे पहिले मंगलस्नान तुला घडेल
अन् जीवनभोगी माणसांच्या सुखाची ऊब तुला लाभेल;
तुला पाहू शकणारे नेत्रहीन
तुझ्या पावलांना दिशा दाखवतील;

अरे, तेव्हा आम्हालाही तुझ्या रूपानं
रस्त्याच्या धुळीत यशाच्या खुणा दाखवणारा हसरा आरसा
सापडला असेल ना !

इथल्या अरण्यात शतकांची तहान साचली आहे,
इथल्या उपेक्षितांसाठी पृथ्वीचे कातळ भेदायचे आहेत.
इथली माळरानं नुसत्याच प्रतिज्ञा ऐकताहेत :
शतकांच्या शपथपूर्तीसाठी आता नांगर उचलायचे आहेत :
ही धरा मग सहस्रदळ कमळासारखी उमलेल, नादावेल :
आमच्यात आलास की भकास मध्यरात्रीच्या एकाकी प्रवासाची
वेळ
पुन्हा तुझ्यावर यायची नाही :
आम्हीच बनवलेल्या वहाणा तुझ्या पायात असतील :
आणखी एक सफेत गळफीत, तुझ्या वेगळेपणाची खूण म्हणून :
शिवाय जमिनीच्या मशागतीसाठी एक अत्याधुनिक ट्रॅक्टर
अन् भरधाव माळरानं तुडवणारी एक जीप :
झालंच तर विरंगुळ्यासाठी मासे पकडायचा गळ,
विश्रांतीसाठी दोरीचे एक बाजले
अन् जगातले बरेवाईट तुझ्यापर्यंत पोचवायला एक रेडिओ सेट.

अरे इथं तुला तुझे सहकारी भेटतील, पण एकेकाळच्या त्यांच्या
अस्ताव्यस्त झुलुपांचा
आता नीट भांग वळवला असेल.
रंगीबेरंगी रिबिनींनी नटलेल्या अन् चांदीरूप्याच्या दागिन्यांनी
सजलेल्या मुली,
तुझ्याएवढीच कंगाल, पण तुझ्याहूनही हसतमुख मुलं
इथं असतील !

पण तू अस्वस्थ व्हायचं नाहीस;
पुन्हा कधी कुठले नवे कोकरू वा गाढवाचे पिलू

त्याच्या स्वप्नांसकट येथे मारले जाणार नाही :
अरे, तुझे कोवळे दुबळेपणही आम्हाला प्यारे आहे.

शस्त्रांच्या सावटापासून हे जग अखेरचं मुक्त झालेलं,
कायमचं सुखी झालेलं आम्हाला बघायचं आहे,
म्हणून तर तुझ्या प्रेरणांची बीजं तू नव्यानं येण्याआधीच आम्ही
रोवली आहेत;
नेमक्या वेळी त्यातून धानाच्या ओंब्याही मोहरून आल्या आहेत :
हे करुणाकरा,
आमची व्यथा सदैव शांत अन् समाधानीच होती.
आमच्या वेदनांनी अन् हुंदक्यांनी वीस शतकं अंगावरून गेलेली
पाहिली
स्वप्न जगणारे शहीद तुझ्या अस्मान–छायेतून चालतच होते !

आकाशस्थ दुतांनी जाहीर केलेल्या,
तुझ्या आगमनाच्या क्षणाची वाट पाहत
तुझ्या वस्तीतल्या खडकांवर आम्ही केव्हाचेच बसून आहोत :
तो मुहूर्त, ते स्थळ चुकू नये म्हणून तर आम्ही हे रस्ते, ही स्टेशनं,
ही बंदरं बांधून काढलीत :

आमची कलेवरं युद्धात कोसळतच होती :
भावाच्या वाराखाली भाऊ मरतच होता :
तूही तेव्हा स्तब्ध होतास–
अर्थ ओसरलेल्या शब्दांच्या सहस्र भाषांमधून
आम्ही मात्र काहीच न सांगता बरंच बोलत होतो !

तिरस्कार अन् द्वेषाची विषारी पकड
आमच्या हाडांवर घट्ट झाली होती;
आमचे शहाणपण मोठे, पण आकलन थिटे होते !

आम्ही आमच्या दुर्दैवाचे चेहरे आता ओळखले आहेत
अरे, आम्हीच सारे ज्ञान ग्रंथालयात कुलुप–बंद केले होते

सगळी स्वतंत्र पाखरे पिंजऱ्यात कोंडली होती
साऱ्याच स्तंभांना आमच्या दंभांची मापे लावली होती
अन् सगळी सुवर्ण–संपत्ती तिजोऱ्यात दडवून
भुकेल्या वाळवंटापल्याड अलगद उडून जाण्याचे तंत्र आत्मसात
केले होते !

ये, आमच्या माणसांच्या दुनियेत फिरून एकदा ये !
चेहराभर पसरलेल्या आमच्या फेंदारल्या नाकांना बिचकू नकोस
भुवई–हीन कपाळांनी अन् तुटक्या, वाकड्या बोटांनी भांबावू नकोस
अरे, आमच्याच शोधात तुझ्या दिशेनं केलेल्या प्रवासातच हे सारं
गळून गेलं आहे !

बघ, आम्ही तुझ्यासाठी गवताचा मुकुट बनवलाय,
युद्धात वंचना अन् शांततेत समृद्धी ठरणारा
भूगर्भातल्या खनिजांचा अनमोल गालीचा अंथरलाय्,
स्वरांच्या झुळकी थोपवणाऱ्या एरिअलसच्या गुढ्या
अन् प्रकाश खेचणाऱ्या तारांची तोरणं आम्ही लावलीय,
शिवाय धरतीच्या पोटात दडलेल्या पाण्याची कारंजीही उठवली,
तुझ्यासाठी !

ये राजपुत्रा, गोमूत्र अन् शेणानं भरलेल्या धुळीत बसणाऱ्या,
आमच्या मुलांसोबत अभ्यासाला ये.
तुझ्यासाठी वस्त्रं विणणाऱ्या चक्रांची गाणीही इथंच ऐक.
पहाटेच्या अंधुक प्रकाशात सायकलींना अडकवलेल्या
दुधाच्या घागर–चरव्याही बघून घे,
तुझी औजारं घडवणारे लोहार–घणही पाहून घे !

आमचा आत्मविश्वास जागवणाऱ्या अन् जगवणाऱ्या,
या धरतीच्या वतीनं तुझ्या मुग्धतेशी
आता आम्हाला कायमचा करार हवाय्
मृत्यूशी लढून आम्ही मिळवलेल्या तंत्र–विज्ञानाचे
तुझ्या अजाणतेशी आता आम्हाला नाते हवेय् !

अरे, आम्ही जिवंतपणीच कुजू लागलो होतो
अपसमजांसोबत वसंताचेही विकारच आम्हाला जडले होते;
ये, अन् आम्हालाही स्वत:सोबत त्या जिवंत गर्तेतून बाहेर काढ !

शेकोटीच्या ज्वाळांनी तांबरलेल्या या छताखाली
जगातल्या साऱ्या नागव्या पोरांसारखे ( अन् भिकाऱ्यांसारखे )
तुझेही स्वागत आहे.
आम्हाला ठाऊक असलेले तुला सांगायचे आहे;
तुला सांगायचेच ते ऐकायचे आहे.

एकत्र काम करू लागलो की प्रेम सहज जमून जाईल
प्रेमाचा विश्वास आला की जगणे सहज जमून जाईल
अन् त्या जगण्याचा आनंद लुटता आला की, मरणेही सहज जमून
जाईल ! !

**रचना** : ज्याँ बूल्हर
**रूपांतर** : सुरेश द्वादशीवार

[ज्याँ बूल्हर हा फ्रेंच प्रतिभावंत काही वर्षांपूर्वी भारतात आला. आनंदवनातील पांगळयांच्या पराक्रमाने तो भारावला. ती शौर्यगाथा त्याने फ्रेंच भाषेत पुस्तक लिहून प्रकाशित केली. या पुस्तकाच्या अखेरीस त्याने येशूला त्याच्या एका वचनाची आठवण करून दिली—
" पुन्हा पृथ्वीवर येण्याच्या."
तू येणारच असलास तर आनंदवनात ये
अशी ज्याँची आळवणी आहे.
या फ्रेंच कवितेचे शीर्षक आहे,
"LES DERNIERS LES PREMIERS"]


करुणेचा
कलाम

## करुणेचा कलाम

खिश्चानिटी विरुद्ध चर्चानिटी या लढाईत
मी खिश्चानिटीच्या बाजूनं उभा आहे
कारण सेवाखोर हात समाजाला देणारा जीझस
त्याच बाजूनं किल्ला लढवताना मी पाहिला आहे.

आकाशाचा वेध घेणारे चर्चचे उत्तुंग मनोरे
नेहमीच मोहवीत राहिले
आतल्या घनगंभीर घंटांचा गहिरा नाद
अन् प्रचंड ऑर्गन्सची खर्जातली सुरावट
नेहमीच आकर्षित करीत राहिली.
पण त्या धर्ममार्गाच्या कडेनं जाणाऱ्या पायवाटेवरून
खालच्या मानेनं चालणारा मी पाहिला
खिन्न खिस्त.

यावेळी तो खांद्यावर क्रूस वाहून नेत नव्हता
तसल्याच आकाराच्या नांगराचे अवजड ओझे वाहत होता.
माथ्यावरचे घर्मबिंदू तसेच होते.
अन् जगाचा भार वाहिल्याचा श्रांत चेहराही तोच होता
मी चट्‌दिशी त्या धूळमाखल्या धर्ममार्गावरून उतरलो
अन् नांगरधारी खिस्ताच्या पायवाटेनं चालू लागलो
माझ्या पुढून चालणारा तो निर्माता भारवाहक
अजून चालतोच आहे.

पायवाटेच्या कडेची माती खणून
जवळचा धर्ममार्ग मजबूत करणारे
मी पाहिले बेदरकार कामगार
आणि पाहिले त्यांच्या काळ्याशार पाठींवर
घामाच्या उभ्या-आडव्या धारांनी कोरलेले ओले क्रूस
तेव्हाही मला घडले ख्रिस्तांचे समूह दर्शन
अन् गवसले समाजाच्या उत्थानाचे समर्थ आश्वासन.

काळ्याशार जमिनीवरच्या काटेरी तारांवर
प्रसन्न मुद्रेनं अंग टाकलेल्या वेलींवर
द्राक्षाचे घोस पाहिले तेव्हाही
रक्तबंबाळ शरीरानं आशीर्वादाचा हात उभारणारा
ख्रिस्त मला दिसला.

महारोगाच्या जखमा नजरेत भरण्याआधी
मला दिसले त्याच्या कपाळावर कोरलेले
वीस शतकांआधीचे तुझे चुंबन
अन् त्या स्पर्शानं पूर्णत्व पावलेल्या देहांनी
मला घडवलेला
सजीव देहांच्या मायकेल अँजेलोचा साक्षात्कार

जेव्हा कुणी शल्यविशारद एखाद्याची वेदना घालवतो
अन् आंधळ्या संवेदनांना लाभतात डोळ्यांचे सूर्य,
दूर निब्रीडातून हिंडताना दिसते अनवाणी सेवा
अन् वठल्या मनांचे पालवतात खुंट,
खोपटाच्या लक्तरांतून झिरपतो एखादाच मिणमिणता किरण
अन् तेवढ्या प्रकाशात सोडवली जातात विश्वाची गुढं,
भुकेच्या कराल जबड्यात भरतो एखादाच चिमुकला घास
अन् आसमंतातला निवतो विक्राळ वणवा,
राष्ट्रांच्या अन् धर्मांच्याही क्षितिजापल्याड जातो करुणेचा स्पर्श
आणि जेव्हा सत्तामत्तांपुढे उभे होते निःशस्त्र आव्हान

अन् छळवादाला बसते करुणेची जरब
तेव्हा त्या साऱ्या जागा होतात माझ्यासाठी ख्रिस्तमय

पण आकाश व्यापणारे विचार
जेव्हा बासनात बंदिस्त होतात,
अन् त्यावर मालकी सांगतात
अंगुष्ठाएवढी माणसे
तेव्हा चर्च अन् मंदिराचे होतात
क्रूर कैदखाने
आणि दिसतात त्यांच्या भक्कम गजांआडचे
बंदिस्त प्रेषित अन् बंदिवान परमेश्वर
कैदखान्यांच्या किल्ल्या कमरेला खोचलेली अंगुष्ठमात्र माणसे
मग निघतात वसुलीला
बंदिस्त भांडवलाचं घरबैठे व्याज !

ते म्हणू लागतात,
सूर्यचंद्रांना उगवायला आमची परवानगी लागते
अन् आपलं म्हणणं खरं ठरवायला ते
पाखंडी माणसांना मृत्युदंड देतात
आमच्यासाठी तू जगलास
अन् तळहातांना खिळे ठोकून
वधस्तंभावरचे मरण पत्करलेस आमच्यासाठी.
ते म्हणतात तू नंतरही जगलास
पण तेव्हापासून तुझ्या तळहातांना खिळे ठोकण्याचा खेळ
आम्ही चालवला आहे
अन् तुझे नाव घेतच आम्ही तुला वधस्तंभावर चढवले आहे.
जीझस ! तुझं हे नित्याचं मरणही मी पाहिलं आहे
तुझ्या शिकवणीसाठी जेव्हा माणसं जिवंत जाळली अन् गाडली गेली
तेव्हा दिसले
ते तुझेच विव्हळणारे देह होते.

अरे, दगडांचे पुतळे जिवंत करून माणसं मारणं
हा तर इथला जुनाच शौक आहे.
आपल्या दगडी मुद्रा घेऊन चौकाचौकात उभे असलेले,
आपल्या निर्जीव नजरांनी आपल्याच संहितांची हिंसा पाहणारे
सारे महापुरुष नाहीत का मानकरी
तुझ्याच थोर अन् अपेशी परंपरेचे ?
तुझे मारेकरीही आहेतच अजून–
माणसांच्या सामूहिक मरणांचे ते आता मक्तेदार झाले आहेत
क्रुसावरचा तुझा देह तुझ्या मित्रांनी तेव्हा उतरून घेतला,
ऑस्‌विट्‌झच्या कत्तलगारातल्या मानवी देहांच्या तुकड्यातून
नेमका तुझा देह आता कसा शोधायचा ?
मायलाईतल्या प्रेतांच्या ढिगाऱ्यातला ख्रिस्त कसा ओळखायचा ?
तो ओळखता येऊ नये म्हणून तर ही स्पर्धा नसेल
मोठाल्या शस्त्रांची ?

या यंत्रजगात नाती हरवली
अन् शब्दांचे अर्थ ओसरले आहेत
द्वेष अन् तिरस्काराची विषारी पकड
हाडावरच घट्ट आहे
इथं शहाणपण मोठं–पण आकलन थिटं आहे
अन् दुर्दैवाचे चेहरेच आकर्षक ठरले आहेत
इथं ग्रीष्मच नाहीत गरम
वसंतही विकारी झाला आहे.

‘ शत्रूंवर प्रेम करा ’ तू म्हणालास,
‘ त्यासाठी माणसांना आधी शत्रू करा ’ ते म्हणाले
तुझ्याच नावाचे झेंडे घेऊन दोन हजार वर्षे
त्यांनी चालवले जगभर ज्यूंना जाळण्याचे जंगी कार्यक्रम
अन् पाखंड्यांना संपवण्याचे राक्षसी प्रोग्राम.
भक्तांनी पाडलेले देवतांचे मुडदे पाहताना

मुके अश्रू ढाळणाऱ्या श्रद्धावानांचाही पाहिला
एक पाखंडी प्रवाह.
न खळाळणाऱ्या या प्रवाहात संथ पोटातच शांत झाले सारे
निर्दयी पोप अन् पुरोहित
निवले त्यातच तुझे अन् तुझ्या संहितांचे मारेकरी
श्रुति अन् आज्ञांच्या नियमांनी माणसे तोलणारे श्रद्धा–दलाल

अश्रूंचा हा प्रवाहच आहे विस्तारित वारस
क्रुसावरून उतरलेल्या तुझ्या कलेवरावर
मेरीनं ढाळलेल्या अमोल आसवांचा
तोच वाहत आहे शतकाशतकांतून
हाडामासांच्या सजीव पुतळ्यांना माणुसकीचा ओलावा लावीत.
करुणा अन् शांतीचे
सत्य अन् सौंदर्याचे
प्रेम अन् प्रगतीचे सारे स्रोत
उगम पावले याच ओलाव्यातून
देश अन् काळावर
धर्म अन् वर्णावर
माणसामाणसांतल्या दुराव्यावर
उठलेली उत्तुंग माणसं झाली
याच प्रवाहातल्या नितळ माणुसकीनं तुडुंब तृप्त.

मारेकऱ्यांसारखा या निर्माण–सोबत्यांनाही तू सतत भेटला होतास
श्रद्धावानांना उपासनेत सापडलास
अन् श्रद्धाहीनांसाठी प्रश्न झालास
कलावंतांची प्रतिभा अन् सेवेकऱ्यांची प्रेरणा झालास
भुकेल्यांची भाकरी अन् आजाऱ्याचे समाधान झालास
निराधारांचा आधार अन् वर्तमानहीनांचे भविष्य झालास
आणि झालास नसणारांचं असणं

कोळ्यांच्या पोरांसाठी अन् दुनियेतल्या दैन्यासाठी
तू ढाळलेल्या अश्रूंशी नातं सांगणारा तो करुणाप्रवाहच
उभवीत आला स्वप्नशेती
माझ्या वर्तमान अन् भविष्याची
ज्यावर अखेरचा निःश्वास सोडलास
तो क्रूस म्हणूनच माझ्यासाठी सेवेचं विरामचिन्ह बनला नाही,
जीवनातल्या साऱ्या बेरजांचा संकेत बनला.
अत्याचाराचं प्रतीक बनला नाही;
करुणेचा कलाम बनला ! !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2492
क्र. क्र. 27354
शाखा (स्थळ प्रत)

## अश्रूंच्या नोंदी

आपण सर्वत्र हजर राहू शकत नाही म्हणून
परमेश्वरानं आई निर्माण केली
आणि फुलवली वात्सल्याची पखरण.
ज्यांच्या पावलांना कुटुंबांची कुंपणं
अडवू शकत नाहीत
अशा धडपडणाऱ्या पोरांच्यासाठी
त्यानं निर्माण केले
मातृहृदयी महापुरुष.

साने, पांडुरंग सदाशिव
धडपडणाऱ्या पावलांचा असा वत्सल पथदर्शक.
त्यांच्या संवेदनाचा सल्लागार,
विवेकाचा वाटाड्या
जाणिवांचा जाणकार, स्वप्नांचा सहकारी
अन् भविष्यांचा भागीदार!

माझ्या स्मरणांच्या गाथेत
त्याच्या अश्रूंच्या नोंदी आहेत
देह दुखावला पण मन प्रसन्न आहे
त्याच्यावरल्या श्रद्धेतलं सातत्य कायम आहे
उगवणाऱ्या प्रत्येक दिवसात तो असणार म्हणून
माझा 'आज' समाधानात संपणार आहे.

' जमिनीवरच्या फुलांवर अंधाराची
काळी चादर येते तेव्हा,
आकाशात फुलणाऱ्या फुलांना तारे म्हणतात
अन् आकाशातली फुलं उन्हानं कोमेजली की,
जमिनीवर उगवणाऱ्या ताऱ्यांना फुलं म्हणतात.'
मी अनुभवलं तुझं ताऱ्या–फुलांशी असलेलं नातं–
अन् तुझ्या मनाचं गंधजीवी चांदणं–
त्यानं माझी संवेदना प्रकाशमान बनली
अन् क्षीण क्षण निर्मितिक्षम झाले.

ज्यांना आयुष्याचं आव्हान स्वीकारता येत नाही
ते उपहासात समाधान मानतात
जे आव्हानाच्या दिशेनंच धाव घेतात–
ते समाधानाचाच उपहास करतात
भलत्याच कोरड्या नजरेनं–जीवन पाहणारे
खूप भेटले बर्फभूत बुद्धिवादी !
दूरस्थ दुःखांच्या नावानं ते टाकायचे
एखादाच कोरडा उसासा.

आपल्या कुंपणातल्या व्यथांनी
ते व्याकुळही व्हायचे–
अन् कधी अश्रू ढाळायचे स्वतःसाठी.
ही स्व–गत माणसं तुझ्या अश्रूंचा
उपहास करायची.
त्यांच्या वक्तशीर जाणिवांना कळलेच नाही,
' तुझ्या आसवांना चिरंतनाचा स्पर्श होता.'

ते तुला रडका म्हणायचे–
अन् तूही सगळ्या युगांची दुःखं जगल्यासारखा
गुडघ्यावर हनुवटी ठेवून बसायचास विषण्ण.

तुझ्या लेखणीनंही दाखवली
तुझ्या सांस्कृतिक श्रीमंतीएवढी
तुझी अश्रुसंपन्नता.
म्हणायचास,
‘ माझ्या अश्रूंनीच माझं ध्येय मी प्राप्त करीन
त्यात आहे वज्राचं, पाषाणाचं चूर्ण करण्याचं
सामर्थ्य,
अश्रुबिंदूत भरलं आहे, ब्रह्मांड.
जीवनग्रंथाचा तो आहे मनोहर पूर्ण-विराम.
अश्रू माझा परमेश्वर आहे
माझा अश्रू हिरावून घेऊ नका
डोळ्यांच्या कडा सदैव ओल्या राहू दे.’

तुझ्या आसवांनी दाखवलं
माणुसकीचं विवेकी वळण,
कोणत्याही कृतीचा ती स्व-गत माणसं
करतात सौदा
तिची किंमत कानांनी ऐकून.
अन् काही ओळखतात तिचं मूल्य
आपल्या जाणकार नजरांनी.
तुझ्या नम्र नजरेत मी पाहिल्या
मूल्याच्या ओल्या जाणिवा.

तुझी समाधी कुणी शोधणार नाही
अन् पूजाही होणार नाही तुझ्या पादुकांची
तुझे पुतळे उभारले जाणार नाहीत
कदाचित् तुझे स्मारकही नसेल सार्वजनिक.
माणुसकीच्या गहिवरातून उमटणाऱ्या
प्रत्येक अश्रूत मात्र
घडेल तुझे व्यक्तिदर्शन.

अन् तू प्रवाहित होशील,
आसवांच्या पारदर्शक कबरीमधून.

तुझ्या क्षितिजाच्या परिघावरून
भरारी घेताना मी अनुभवला
तुझ्या पंखांनी सोसलेला जीवघेणा ताण
अन् जाणवलं,
माझ्या पंखांच्या दुबळ्या फडफडीत
बोलकी झालीय्
तुझ्याच मनाची आकाशभर तळमळ !
माझ्या जखमी पंखांना तेव्हाचा जडला आहे
लांब पल्ल्यांचा ध्यास.
शिशिराच्या थंडीत कुडकुडताना,
उबाऱ्याचं आमंत्रण आता आकर्षक वाटत नाही.
त्या गारठ्यात गोठलेली
हिमालयाची अविचल कांचनशिखरं
पहावीशी वाटतात.

तुझ्यात ख्रिस्ताची अमर्याद सहनशीलता होती,
तुझ्या प्रेमाला क्षितिज नव्हते.
तुझी क्षमाशीलता निःसंकोच होती,
तुझ्या करुणेला सर्वव्यापित्वाचं वरदान होतं–
माझ्या प्रत्येक कामात होती
तुझी अदृश्य उपस्थिती
तिनं माझ्या समजांना प्रतिष्ठा दिली
आकांक्षांना पावित्र्य दिलं–
अन् नात्यांना गोडवा दिला,
आयुष्यातल्या अंधारदऱ्यांचे तिनं बनवले
प्रकाशस्तंभ

आणि दिली माझ्या मनाला देशाच्या
अन् देवतांच्या थोरवीची गाणी.

हृदयांचा थरार अन् मनांची स्पंदनं
न टिपणारी तत्त्वज्ञानं–
तत्त्वहीन अन् प्रकाशशून्य होतात.
अन् तुझ्यासारखा आसवाचा ओलावा नसला की,
विचारवंतांचे दगडी पुतळे होतात.
त्यांचं ' मार्गदर्शन 'ही मग होतं,
खडबडीत रस्त्यावरच्या उन्हाळी
प्रवासासारखं तापदायक.
त्यांच्या लेखी माणूस ' लक्ष्य ' होतो,
तो अंतराचं दुसरं टोक म्हणून.
त्या टोकाला ते भिंती बांधायला निघतात,
अन् कड्यावरला माणूस पडू
न देण्याच्या प्रयत्नात
ते माणसाला भिंतीच्या आड बंद करतात.
तुझ्या लेखी माणूस अंतराचं टोक नव्हता,
अंतरं सांधणारा पूल होता.
ते शब्दबंबाळ विचारवीर,
घटनांच्या दर्शनी तुटकपणावरच
नजर खिळवून बसले.
तुला घटनांच्या परस्पर नात्यावर
आपला प्रकाशझोत वळवता आला.
म्हणूनच ' अभाव–बंद ' तत्त्ववेत्यांच्या खडखडाटी
व्यवहारात चाललेली
' जीव–बंद ' प्रवृत्तींची तुझी उपासना
आमच्यातल्या ' माणसा 'ला वात्सल्याचा
स्पर्श घडवीत गेली.

जिवा–शिवाच्या अद्वैताचे रहस्य
उलगडून दाखवितानाही
ते स्वतःच्या मुक्तीसाठी वापरण्याचा स्वार्थ
तुला शिवला नाही
ती मुक्तीही तू खरी मानली नाहीस
म्हणालास, शिवाशी अद्वैत साधायचे तर
सभोवतीच्या जिवांशी ऐक्य साधायला शिका.
सारेच जीव त्या शिवाचेच आहेत अंश
आणि तो शिव या जीवांहून वेगळा नाही.

गवताची लुसलुशीत पाती पाहून द्रवणारा
अन् हाताचा कोयता फेकणारा कमाल,
उपाशी कुत्र्यामागून तूप–रोटी
घेऊन धावणारा नामदेव,
झाड तोडणाऱ्यापुढे मान देणारे
अन् झाड वाचविणारे तुलसीदास
अन् उपाशी वाघिणीच्या तोंडात
मांडी देणारे भगवान बुद्ध
या साऱ्यांत तू पाहिलेस जागलेले अद्वैत.

अन्नाचे साठेबाज नुसते धान्याचे साठे
दडवीत नाहीत
गरीब माणसांच्या मरणांचे साठे जमा करतात.
स्वार्थी माणसांच्या हाती जीवन
असे मरण होते
मेघ साऱ्यांसाठी रिते होतात
झाडं माणसामाणसात फरक करीत नाहीत
फुलं–श्रीमंतांसाठीच फुलत नाहीत
नद्या सारेच जीवन फुलवत निघतात

सूर्य साऱ्यांनाच प्रकाश अन् चंद्र साऱ्यांनाच
संतोष देतो.
अद्वैत हाच निसर्ग आहे.
त्याग हीच त्याची कसोटी आहे
बिंदू सिंधूसाठी
दगड इमारतीसाठी
अन् पिंड ब्रह्मांडासाठी.

मग का हे स्पृश्यास्पृश्य, ब्राह्मण–ब्राह्मणेतर ?
कशाला धर्मयुद्धे अन् जिहाद ?
'अवघे देखिले जन ब्रह्मरूप' का नाही ?
या देशातल्या ऋषींनी,
साऱ्यांत पाहिला 'अवघा चैतन्याचा गाभा.'
त्यांनी साऱ्यांना वंदनीय मानले
म्हणाले, 'स्तेनानां पतये नमः'
समभावात सुख अन् ऐक्यभावात परमसुख ना ?
दुजाभाव हेच दुःख ना ?
तर का हे वेगळेपण ? अन् तेही 'जाणत्या'त ?

म्हणालास, समाजवाद हा व्यवहारातला
वेदान्त आहे
सारे जर अमृताचे पुत्र
तर काहींच्या पेल्यात वीष कसे ?
अद्वैताच्या साठेबाज वारसदारांनी मात्र
त्या जिवंत तत्त्वज्ञानाच्या केल्या जीर्ण पोथ्या.
त्यातल्या ओलाव्याचा स्पर्श
कुणाला होणार नाही
याची खबरदारी त्यांनी घेतलीच
अन् स्वतःलाही त्याचा विटाळ होऊ
दिला नाही.

इथं ज्ञानदेवाची समाधी त्याच्या
ज्ञानेश्वरीहून पूज्य होते
अन् गांधीचा पुतळा त्याच्या विचाराहून
आकर्षक होतो.
सगळ्याच उदात्तांची मंडळीनी अशीच बनविली
अर्थहीन प्रतीके
तू म्हणालास,
जेव्हा अर्थहीन प्रतीके पूजिली जातात
तेव्हा धर्म यंत्रमय होतो
अन् तंत्रावाचून मंत्रांच्या निरर्थक पोथ्या होतात.

समुद्र स्वीकारण्याहून आपल्या डबक्यांनाच
समुद्र मानणे
हे अधिक सोपे आहे
खुज्या माणसांनी आपल्या डबक्यांना
समुद्रांची नावे दिली
धर्म, वंश, वर्ण, जाती, पोटजाती, भाषा, प्रांत.
अन् अद्वैतांचा महासागर हरवून टाकला
तू म्हणालास, अरे, जरा आठवा
आपल्या संस्कृतीनं नदीतलं, वाहत्या पाण्यातलं
स्नान–पवित्र मानलं
समुद्रस्नान पूज्य मानलं,
डबक्यात काय डुंबता ?

तू विसरलास, तूच सांगितलेली
कालडीच्या त्या युवा संन्यस्ताची
दीनवाणी कथा.
चर–अचराचे सारे जग अद्वैताच्या जाणिवेनं
बांधायला निघाला तो
अन् आईचं प्रेत वाहून न्यायला

त्यालाच मिळाली नाहीत चार माणसं
त्या देहाचे तीन तुकडे करून
त्यातला एकेक त्यानंच नेला स्मशानात
स्वतःच्या खांद्यावरून
त्याच्या नावाचा वारसा सांगणारी माणसं,
आता मृतदेहांवर ओढतात तीन रेषा
अन्–पूर्वजांच्या पापांचे घेतात
निरर्थक प्रायश्चित्त.
अद्वैताच्या मंत्रद्रष्ट्याला जे जमले नाही
ते करण्याचा अट्टाहास तू धरलास.

या देशानं ईश्वरच ज्ञानरूप मानला
अन् ते ज्ञान मानलं अनादि–अनंत.
'सनातनो नित्यनूतनः'
व्यासादिकांच्या लेखणीतून ते प्रकटलं
बुद्ध–गांधींच्या वाणीतून उतरलं,
उद्याच्या पिढ्याही त्या अमरत्वांची
गीतं लिहिणारच आहेत.
'वेदात आलं ते अखेरचं
कुराणानं सांगितलं ते शेवटचं' असं म्हणणारे
त्या अनादि–अनंताला एकाच पुस्तकाच्या
मुखपृष्ठापासून मलपृष्ठापर्यंत
बंदिस्त करण्याचा करतात वेडा प्रयत्न
अन् उद्याचा सूर्य नाकारायला घेतात
आजच डोळे बांधून.
इतिहासात थांबलेल्यांना
वर्तमान घडविता येत नाही
भविष्याची स्वप्न पाहता येत नाहीत
अन् त्यांना इतिहासही कळलेला नसतो !

ख्रिस्ताला सूळावर चढवणारे
शंकराचार्यांना आईच्या देहाचे तुकडे
करायला लावणारे
ज्ञानदेवाला छळणारे अन् तुकारामाची गाथा
बुडवणारे असतात
याच क्षणशब्द, शब्दबद्ध परंपरेचे मानकरी
अरे, त्यांनीच नाही का तुला बसवले
पांडुरंगाच्या दारात
आमरण उपोषणासाठी ?

संतत्वाचा पेहराव नव्हता, ती बिरुदं नव्हती–
फक्त त्यातली अथांग माणुसकी होती
शब्दाशब्दातून पाझरत अन्
कृतीतून झिरपत होती.
पंढरपूरचा बंदिस्त परमेश्वर सोडवायला
प्राणांची बाजी लावलीस तेव्हा
मेणाहून मऊ असणारं संतत्व
आम्ही पाहिलं वज्राहून कठोर झालेलं–
आपल्याच विवेकाच्या स्पंदनात हरवलेला तू
आपल्या श्रद्धेचा, त्या महात्म्याचाही
आवाज ऐकायला तयार नव्हतास,
तेव्हाची तुझी उद्दाम माणुसकी
होती सैतानाच्या जिदीहून दाहक अन्
परमेश्वराच्या कृपेहून अधिक मोहक.

हिंसेच्या धगधगत्या मार्गानं जग
बदलायला निघालास
पण त्या धगीनंच क्रांती करपून जाईल म्हणून
मग निघालास करुणेच्या

लुकलुकत्या चांदण्या घेऊन
साऱ्याच सत्प्रवृत्तींच्या विजयाची
वेडी आस धरलीस
अन् स्वत:लाच साऱ्यांचा प्रतिनिधी मानलंस.
विसरलास,
अखंड चालणाऱ्या या लढाईतले आपण साधे
सैनिक असतो
लढणारे, मरणारे, हरणारे.
तुला लढणं जमलं, मरणंही जमलं–
फक्त हरणं जमलं नाही.

तुझ्या हृदयाची तार जुळली होती.
तीच घेऊन निघायचंस,
एकतारीच्या संगतीत संचार करणाऱ्या
एकाकी संतासारखं.
सभोवतीच्या वाद्यमेळाच्या घोळात अडकलास
अन् त्यांच्या तारा जुळवण्याच्या हरकतीत
आपल्याच स्वरांचा गळा कापून घेतलास.

म्हणालास अंधार असा नसतोच कधी
कमी प्रकाशाला मिळालेलं ते नाव आहे
चूक नावाचं काही अस्तित्वातच नाही–
सारं ज्ञानमय आहे
मग मृत्यू नावाची बाब तरी कशी असेल ?
जीवन हेच सत्यांचं अमृतत्वाचं नाव असल्याचं
तूच तर सांगितलंस
( गीताई–प्रवचनांचा तूच तर होतास सच्चिदानंद )
मग हे जीवन नाकारून
कशाला कवेत घेतलास अभाव ?

ते म्हणतात,
न्यायी माणसासाठी अन्यायी व्यवस्थेत असतात
फक्त दोन जागा,
तुरुंग अन् मृत्यू.
तुला तुरुंग नवा नव्हता
मृत्यू तर यायचाच होता
त्यासाठी प्रयत्न का केलेस ?
करुणा होती, कणव होती, प्रेषितांची प्रज्ञा होती
मग का झाला पराभूत प्रेषित ?
एकाकी होतास, मनस्वी होतास
पण अनासक्तही होतासच
मग जीवनाच्या अनासक्तीत का धरलीस
मृत्यूची आसक्ती ?

## सूर्य फुलवतांना

वादळाचा वैताग अनुभवला आहे,
नीरवाचा नाद ऐकला आहे
ऋतूंच्या रंगात दंगतांना
शिशिराच्या सुस्तीसारखी वसंताची मस्तीही
भोगली आहे
प्रत्येक क्षणाची मागणी पुरवली आहे
संकोचशून्य आसवांचा सडाही त्यासाठी
घातला आहे
वैराण वाळवंटात सूर्य फुलवतांना
नखशिखांत आत्मविश्वासानं थरथरलो आहे
आसवांसोबत येणारं हळुवारपण अनुभवलं आहे
अन् हुंदक्यांकडून आत्म्यांपर्यंत गेलो आहे
व्यथेच्या धाग्यात माणसं विणत असतांना
बौद्धिकाची कुसर टाळत आलो आहे
आतल्या पशुत्वाशी अन् अंधाराशी
सतत चितपट केली आहे,
इतिहासाच्या राकट पकडीतून
वर्तमानाचे कौमार्य मुक्त केले आहे.

व्यथेला उभारी येत आहे
झुकलेली मान ताठ होत आहे

काळजाची कळ तीव्र होत आहे
अन् माझे झुंजायचे बळ उचंबळत आहे.

यातनांना फुटताहेत प्रकाशाचे पंख
प्राणांना लागले आहेत प्रेरणेचे डंख
वेदनेच्या लयीवर प्रकाशाची रास झुलत आहे
अन् दुःखाच्या नाभीतून पराक्रमाच्या
कस्तुरीची आग उठली आहे.

व्यथेवर प्रीत जडली आहे
वासनेचा नंदादीप झाला आहे
अहंकार कापरासारखा विरला आहे
अन् माझ्या मस्तीत मी झुलत बसलो आहे.

## सुखाचे साक्षीदार

मी श्रीमंती मागितली
सुखी होता यावं म्हणून
मला दारिद्र्य मिळालं
मी शहाणं व्हावं म्हणून

मी सामर्थ्य मागितलं
माझा जयजयकार व्हावा म्हणून
मी दुबळा झालो
ईश्वराची आठवण यावी म्हणून

मी सारं काही मागून घेतलं
आयुष्य भोगता यावं म्हणून
मला आयुष्य मिळालं
सारं काही भोगता यावं म्हणून

मागितलं ते कधी मिळालं नाही
मिळालं ते मिळाल्यावाचून राहिलं नाही
मुक्या प्रार्थनांना होकार आले
अन् दुःखच माझ्या सुखाचे साक्षीदार झाले.

## तृप्त जखमांचे समृद्ध संस्कार

पिलाला पायात घेऊन अंतराळात
झेपावणारी घार
उंचीचा अंदाज घेत सोडून देते त्याला
वादळाच्या लाटेवर
अन् पडता पडता ते पिलूही घेऊ लागते
आपल्या इवल्या पंखांच्या कोवळ्या कवेत
असीम अंतराळ.
पंखांच्या उमलणाऱ्या जाणिवांसोबतच
त्याला भान असते;
माथ्यावर उडणाऱ्या मातेच्या
संरक्षक वात्सल्याचे.
अंतराळात भरारी घेणारे
अन् सोसाट्यात संतुलन राखणारे
माझ्या पंखांचे सामर्थ्य
मला जाणवले तेव्हा
मला असेच भिरकावले होते
वादळाच्या बेभान कल्लोळात
तशाच संरक्षक प्रेरणांनी.
त्या प्रेरणांच्या
वत्सल सोबतीची कृतज्ञ जाण

मला आजही स्वस्थ अन्
अस्वस्थ करीत आहे.

वादळात वाहून जाणारे असहाय
नुसतेच कोसळतात
वाऱ्याचे क्रौर्य जेथे थांबले तेथे
ज्यांना वाहून नेणारे मंत्र सापडतात–
त्यांना तंत्रही सापडते
हवे तेथे मुक्कामाला थांबण्याचे
अन् पुढले मुक्काम आगावू
निश्चित करण्याचे
पंखांच्या जाणिवेत आकाश आहे;
तंत्राच्या जाणिवेत आहे जमीन
म्हणून मी अस्वस्थही आहे
अन् स्वस्थही.

कोरे चित्रफलक
चेहरे दडवायला वापरणारे
दिवाभीत वेगळे
अन् निर्माणाचे आव्हान मानून
पुढे होणारे
कलावंत वेगळे.
कारुण्य अन् आनंदाच्या रंगगंधाचे
त्यांचे निर्माण–कुंचले रंगवीत निघतात
'आज'चे कोरेपण
अन् रंगाच्या फटकाऱ्यातून प्रगटू लागते
'उद्या'चे अस्तित्व.
ही स्वप्नचित्रेच मग होतात
नव्या पिढ्यांपुढील सर्जनाची आव्हाने.

या यक्षांच्या मेंदूतील खदखदती मूस
घडवीत जाते कल्पनांचे विवेकी जडाव
आपल्या कलाकृतींवर नावाची लेबलंही
न लावता
जेव्हा ते निघतात वर्तमानाचे
कोरेपण धुंडाळीत
तेव्हा त्यांच्या पाऊलखुणाच होतात
काळाच्या चेहऱ्यावरील मोहमुद्रा.
हे अनासक्त अग्रणी नुसतेच हिंडत नाहीत
रस्ते हरवलेलं बावळटपण घेऊन.
उद्याच्या युगाच्या वाटा
त्यांच्या मेंदूवरच कोरल्या असतात
अन् येणाऱ्या पिढ्यांचे चेहरेही
त्यांच्या अंत:चक्षूपुढे स्पष्ट असतात.

माझे भणंग आयुष्य ज्यांनी सावरले
ते असेच सूर्याचे सहकारी होते
ओल्या रक्तखुणांचा मागोवा घेत
ज्या वाटेनं मी गेलो बेभान होऊन
त्या वाटेनेच पूर्वी चालत गेले होते
खांद्यावर अवजड क्रुसांचे भार वाहून नेणारे
रक्तबंबाळ ख्रिस्त.
उक्ती अन् कृतीची जोडी वर्तमानाच्या
नांगराला जोडून
नांगरत गेले ते भविष्याची स्वप्नशेते
अन् बेभानपणे घालत गेले
आपल्याच रक्तमांसाचे खतपाणी
जीवनामागून ते धावले नाहीत
जीवनच स्वत:हून वळले त्यांच्याकडे

आपली प्रश्नार्थक मुद्रा घेऊन
त्यांनीच प्रकाशित केल्या
भविष्याच्या पांथस्थांच्या पायवाटा.
मला प्रवासाची प्रेरणा देणारी
त्यांची आज्ञा होती
' कामाकडे चालत जा '
त्यांनीच दिली अंधाराची
पिसाट आव्हाने पेलण्याची
प्रकाश–साहसे.
जमिनीशी जुळलेल्या त्याच्या
अस्मान–ध्येयांचे
खुणावणेही नित्याचेच होते.
त्यांची दुःखस्वप्नेच बनली
हृदयावरल्या तृप्त जखमांचे समृद्ध संस्कार

मी किरणांचीच अपेक्षा धरली होती
माझ्या अंगणातच सूर्य उगवले
त्यांनीच दिली भूतकाळाची जाण
वर्तमानाविषयीचे सावधपण अन्
भविष्याशी डोळस बांधिलकी.
त्यांनीच खेचून काढले बाहेर
' आज 'च्या सुरक्षित गजांआडून
उद्याकडे पाहणारे भित्रे मी-पण.
अन् साऱ्याच अंधार–पाकळ्यांना दिला
प्रकाशाचा सुगंध.
हिमालयाएवढी ही माणसे, हळूवारही असतात
सूर्याच्या जराशा कठोरपणानं वितळणारी
अन् परागकणांच्या टोचणीनंही
रक्तबंबाळ होणारी.

सौंदर्य अन् स्वातंत्र्याने सभ्य संघर्ष
जगणारे हे
जेथे जातात तेथे नेतात मांगल्य अन्
ऋजुतेचा सुगंध
काटेरी कुंपणावर डोकावणाऱ्या
जुईच्या फुलांसारखे.

बाजारात देह मांडून बसणारी वेश्या
राखत असते पतिव्रतेचं पावित्र्य
अन् तीच सांभाळते समाजाच्या
सभ्यतेची बेगडी कुंपणं
तरीही ती अभागीण असते
उपेक्षेची मानकरी.
हे महामनस्क जपत असतात
त्या शापितेच्या मनाचेही कोवळे कोंभ
वंचकांच्या जमावाच्या हातचे
हल्लेखोर दगड
हिसकावून घेणारे करुणेचे साहसही
येते त्यांच्याच शब्दातून.
त्यांचा वरदहस्त बनवतो
वारयोषितांनाही वंदनीय
मॅगडॉलची मेरी अन् उज्जैनची आम्रपाली मग
विसरायच्या भोगाची ठिकाणं राहत नाहीत
आठवायच्या योगाची स्थानं होत असतात.
अज्ञात बापांच्या पापांची लेकरं कुशीत घेऊन
असाच एक थवा आला होता.
चेहऱ्यावर दुसऱ्यांच्या अपराधाचे ओझे मिरवणारा.
मी म्हटले, ' तुम्ही जीवन जन्माला घातले आहे
माझ्या लेखी तुमचेही मातृत्व आहे वंदनीयच

देवकी अन् यशोदेसारखे.
त्यातल्या एकीनं निरोपाचे ओठ उमटवले
पायाच्या अंगठ्यावर.
तेव्हाच्या तिच्या अमर्त्य नमस्काराचे
मी मर्त्य निमित्त होतो.
कारण मी मानतो
त्या बेथलहेमच्या सम्राटासारखे
माझे सारे स्रोत तेथेच उगम पावतात.

आदर्शांची ही सजीव लेणी
त्या महासत्तेचीच असतात रत्नांकित आसवे
सारखेच असतात त्यांचेही यातना-भोग
म्हणूनच मला दिसतात.
गांधीच्याही तळहातावरच्या क्रुसावरील खिळ्यांच्या खुणा
अन् ख्रिस्तांच्या छातीवरचे पिस्तुलाचे डाग
मी पाहू शकतो अद्वैत
पठारावरच्या प्रवचनाचे अन्
कुरुक्षेत्रीच्या कर्मयोगाचे.
म्हणूनच धापा टाकू लागलो की,
विश्रांतीला मला चालते
बोधीवृक्षाची गडद् सावली अन् क्रुसाची ही अपुरी छाया
अनेक छोट्या आरशातून
मीच होतो प्रतिबिंबित
अन् चितारला जातो
माझ्याच मनाचा चित्रालोक,
म्हणूनच ओंजळीतल्या रक्ताच्या पाण्यात जमवत असतो
असंख्य असंबद्ध प्रतिबिंबे
माझ्याच शतखंडित सूर्याची.

ग्रंथालय ठाणे
रा. क्र.

## सार्वजनिक चेहरे

सार्वजनिक चेहरे मिरवणारांचीही एक जात आहे
ती दडवीत असते खाजगी चेहऱ्यावरचे वंचनेचे डाग.

त्यांची बांधिलकी गर्जत असते लाऊडस्पीकरवरून
भुकेल्यांना ते फक्त भाकरीची स्वप्ने देतात.
अन् उडवीत येतात शिंतोडे उपदेशाचे
भरल्या पोटी पान खाऊन टाकलेल्या भडक पिचकारीसारखे
समाधानपूर्वक.

कर्माच्या रिकाम्या जागा ते भरतात
पोकळ शब्दांनी.
क्रियांशी त्यांचा संबंध नसतो;
ते फक्त प्रतिक्रियाच व्यक्त करू शकतात
घटनांबाबतची निरर्थक मतं मांडतात ते
घटनांची समर्पक मांडामांड त्यांच्या कुवतीबाहेरची असते.
संदर्भच सांगत येतात ते
अर्थ त्यांनाच कधी आला नसतो
नुसतेच वणवणत असतात.
परीटघडीच्या कपड्यात आपलं वजनदार रितेपण घेऊन
तोंडाने मंत्र बरळत
कुणाही देणेकऱ्यांच्या लाचार जयजयकाराचे.

त्यांना सांगावयाचे आहे
अरे ! जरा बघा त्या कोटी डोळ्यांच्या आरशात
तिथं दिसतील तुम्हाला तुमच्या पराभवाचे दारुण चेहरे
अन् कधी पहाल हिंमतीनं आपल्याच आत डोकावून
तर बघाल तिथं आपल्याच अस्तित्वाचे अर्थहीन आभास
कारण त्यांनी आता नाकारलं आहे, तुमच्यात आपली प्रतिबिंबं पाहायचं
अन् ठरवलं आहे, आपल्यात तुमची प्रतिबिंबं बघायचं.
ते कोटी डोळे नुसतेच भकास अन् भयग्रस्त नाहीत
भयकारीही आहेत.
प्रेत नसलेल्या थडग्यावरच्या भयाण स्मारकासारखे
अन् त्या डोळ्यांवरील भुवईची झाली आहे
एक हिंस्र कमान.
अजून सावध व्हा,
कृतीच्या परिसावर विचारांचा कस ते लावणार आहेत.

बाबांनो, आयुष्य थोडं आहे
अन् शतकं सावरायची राहून गेली आहेत.
कल्पनांचे कार्यक्रम अन् विचारांची वर्तणूक बनवायची आहे.
शोषणाकडून स्वातंत्र्याकडे जायचे आहे.
भूतकाळाची लांबी नुसतीच अनुभवसंपन्न बनवीत नाही,
ती थकवाही आणत असते.
शतकांसोबत समृद्धीच येत नाही, ग्लानीही येत असते
म्हणून माणसांसारखेच असतात जुने समाजही आत्मग्रस्त
तेच बांधून असतात स्वत:भोवती तुरुंगाच्या उंच भिंती
अन् भिंतीवर गस्तीला ठेवतात नादुरुस्त आत्मग्रस्त
प्रत्येक पिढी वाढवितच जाते या भिंतीची उंची
अन् पहाऱ्यावरच्या रूढींच्या रक्षकांची संख्या.

हे आव्हान मोठे आहे
त्यासाठी करावी लागेल याच क्षणापासून

एक डोळस उपासना
ओढून काढावे लागतील
काळाच्या अथांग सागरात रुतलेले जीवनाचे नांगर
अन् साधावे लागेल अद्वैत
शतकांनीच दुरावून ठेवलेल्या माणसामाणसातून
स्वत्व अन् प्रेरणेच्या, संघटना आणि समाजशीलतेच्याही
बदलाव्या लागतील तऱ्हा.
तेव्हा गवसू लागेल कामातले तर्कशास्त्र अन् नवनिर्माणाची उत्तरं
अन् मुक्त होऊ लागेल वर्तमानाची सर्जनशीलता.

गरिबांची ही लोकशाही गरिबांच्याच साठी चालवायची तर
एक झुंज आणखी द्यावी लागेल,
खाजगी स्वार्थाविरुद्ध सामूहिक कल्याणाची
समविचारी सहयोग्यांची युयुत्सू फौज उभारावी लागेल
तेव्हाच विजय मिळविता येतील
अंधाराच्या सामर्थ्यावर दैदिप्यमान भविष्याचे

गांधी म्हणाला, उद्दिष्टे पुढे चालवत न्या
मूल्यांचे नुसते अधिष्ठान असून भागणार नाही
प्रेरणाही मूल्यांचीच असावी लागेल.
ती अर्थाच्या प्रेरणेहून प्रबळ असेल
अन् प्रचंड अर्थोत्पादनाकडेही नेणारी असेल.

मूल्यांची प्रेरणा जागवणारांना मूल्यांशी प्रामाणिक असावे लागते
लाऊडस्पीकरवरून बांधिलकी गर्जून सांगणारांचे सोपे असते,
गर्दीचा गहिवर असणारांना फार मोठी किंमत चुकवावी लागते,
प्रेममय जीवन जगायचे तर जीवनावरचे प्रेम कमी करावे लागते.

लोकांची भीती म्हणजे लोकांविषयीचा आदर नव्हे
अन् लोकानुनय हे लोकशिक्षण नव्हे.
करुणेचे सुस्कारे क्रांती घडवीत नाहीत–

भिकेचे उदात्त तत्त्वज्ञान जन्माला घालतात
अन् अनुदानाचे राजकारण स्वाभिमानी समाज निर्माण करीत नाही
आशाळभूत लाचारांचे तांडे ते उभे करीत असते.

दोस्तांनो विराट दु:खांच्यासाठी विराट साहसे हवी आहेत
तुमच्या खोट्या समाधानाखातर हे सांगत नाही
पण लक्षात ठेवा–
दु:खांचा वावर कोपऱ्यातून होतो
आनंद सर्वभर आहे.
दु:खांच्या कोंदणात सुख नाही.
सुखांच्या कोपऱ्यात व्यथांची अडगळ आहे
सर्वम् दु:खम्, सर्वम् क्षणिकम् म्हणणाऱ्या तथागताच्या चर्चेवरचं
मंद मधुर हास्यच मला नेहमी वाटलं आहे
त्यानं पाहिलेल्या दु:खाहूनही अधिक सनातन
महारोगानं छिन्नविछिन्न चेहरा मला कुरूप दिसत नाही
त्या चेहऱ्याच्या अवशेषात मी पाहतो
त्याच्या जन्मजात सौंदर्याचे शिल्प
कैलास लेण्यातल्या खंडित पार्वतीसारखे

सूर्याचे एक नाव मित्र आहे
तो अंधार नाहिसा करतो अन् सृजनाचे सामर्थ्यही देतो
या समाजाला मित्र हवे आहेत.
त्याच्या 'साठी' काही करण्याऐवजी त्याच्या 'सोबत' खपायला येणारे.
या मित्रांच्या वाटा बहुदा एकांडी असतील
पण हे एकाकीपण सूर्याचं असेल.
सारं जग हिरवंगार बनवण्याची प्रतिज्ञा केलेल्या
अन् सृजनाचा संकोच न बाळगणाऱ्या
इवल्या बीजाचं ते एकलेपण असेल.
ते एकटेपण संतांचं अन् सेनापतींचंही असेल.
हे एकाकीपण जगण्यासाठी कटिबद्ध झालेले मित्र

जेव्हा सुरक्षितता झुगारतात अन् संधी शोधतात
तेव्हा खिळखिळे होऊ लागतात
वर्तमानाचे साखळदंड.

या मैत्रीचा मोबदला मानमरातब नसेल
मैत्रीच असेल.
हे भान असले की मग वैफल्य येत नाही,
वंचनाही येत नाही.
मग सार्वजनिक चेहरा खाजगी चेहऱ्याहून
वेगळा ठेवावा लागत नाही,
कारण लपवायचे वंचनेचे डाग वाट्याला येत नाहीत.

## संक्रमण : बिनचेहऱ्याच्या शतकाचे

या शतकानं आपला चेहरा गमावला आहे
म्हणून जुन्या आठवणी जपणारांची फसगत अटळ आहे.

माणसांना असते तशी वारसाहक्कांची चेहरेपट्टी
मिरवीत येतात शतकं देखील
इतिहासानं निर्मिलेल्या निबर परंपरांची
काळपुरुषानं पाहिले आहेत या चेहऱ्याच्या माथ्यावर
भस्मचर्चित जटासंभार अन् ऐश्वर्यसंपन्न राजमुकुट
विजयाचे उन्माद न्याहाळतानाच त्यांना दिसले आहे
शरणागतीनं काळवंडलेले ठिक्करपण
सम्राटांची शतकं सरंजामदाराच्या दावणीत गेलेली
अन् उद्योगाच्या उफाड्यानं त्या दावणी तोडून मुक्त होताच
पुनः उद्योगाच्या भक्कम चाकांनाच ती बांधली गेलेलीही
पाहिली आहेत याच काळानं !

सम्राट अन् सरंजामशाह संपले आहेत
अन् पैशाची मक्तेदारी पळवाटा शोधते आहे
इतिहासाचा पोत बदलला आहे
विसावं शतक सामान्य माणसाचं शतक ठरणार आहे !

घामानं डबडबलेला सामान्य माणसाचा चेहरा
हाच क्रांतीचा चेहरा आहे

सायलेंट मेजॉरिटीत वावरणारा हा चेहरा जेव्हा विक्राळ होतो
तेव्हा खिळखिळी होतात घट्ट सिंहासने अन् आश्वस्त धर्मासने
शिवाय त्याला आता चांगले समजले आहे
निःशब्द राहणारांना कायमचे निःशब्द बनवले जाते.

या शतकाच्या पुत्रांना रोखण्याची ताकद
इतिहासाच्या बुजगावण्याने गमावली आहे
धर्मपंथांच्या, संस्कृती–परंपरांच्या
रंगीबेरंगी चिंध्यांची ही बुजगावणी
आपल्या खऱ्या रूपात उघडी झाली आहेत
अन् या बुजगावण्याच्या डोक्यावरच तरुणाईचे थवे
नाचू लागले आहेत.

इतिहासात जन्मलेले इतिहासातच गाडले जाणार आहेत
अन् राजकारणाचा ऐतिहासिक संदर्भ संपुष्टात येणार आहे
गतिमान जगात अगतिकांना स्थान असणार नाही
अन् अश्मीभूत विचारांच्या प्रतिनिधींना
प्रकाशाचे मानकरी होता येणार नाही.

जगातल्या सर्वोच्च सत्तास्थानाचे
आज झाले आहेत संवेदनाशून्य वादाश्रम
लोकशाहीतल्या नेतृत्वानं साठी
अन् हुकुमशाहीतल्या सत्ताशाहीनं सत्तरी ओलांडली आहे
संदर्भहीन शतकांचे संबंध सांभाळणारे हे भविष्यहीन म्हातारे
बांधताहेत नव्या पिढ्यांचे उन्मेष
कधीच्याच वठून गेलेल्या यमनियमांनी.

तरुण मनांना हवी आहेत आव्हाने
रुंदावत जाणाऱ्या तेजाळ क्षितिजांची
क्षितिजांचे वेध घेऊ शकणाऱ्या विज्ञानपंखांची
अन् म्हातारे डोंबारी दाखवताहेत त्यांना

बाईस्कोपच्या डबड्यातले डळमळणारे ताजमहाल.
आपल्याच अंधारात कोळीष्टकं विणणारे
अन् दवबिंदूच्या शोभेनं किडे आकर्षित करणारे
राजकीय कोळी
अन् नवे जोडे घालून जुन्याच रस्त्यांनी चालणारे
बागेतल्या गोल रस्त्यांनी चालल्यासारखे
कुठेच न पोहचणारे राजकीय पक्ष.

जमावाच्या डोक्यावर स्वार होणारांचाही आहे
एक नेतृत्व–गट
तो फरफटत असतो जमावाचे दिशाहीन पाय फिरतील तसा.
त्याच फ्रेंच क्रांतिकारकांसारखी
ती स्वत्वशून्य वावधूळ मात्र म्हणत असते
'मला माझ्या खिडकीतून पाहिले पाहिजे
माझे लोक कुठे जातात ते
कारण मी त्यांचा नेता आहे.'

गुरोव्हस्की म्हणाला,
सारे जग चालले आहे आपल्याच कबरीच्या दिशेनं
अन् कबरी खोदणारे गुन्हेगारच आहेत साऱ्यांच्या आघाडीवर
शस्त्रास्त्रांच्या साठ्यावर स्वार झालेले
रीगन्स् अन् ब्रेझनेव्हज् नुसते नेतेच नाहीत
माणसाच्या सामूहिक मरणाचे मक्तेदारही आहेत–
कधीतरी किंचाळतात ते कल्याणाचे कर्कश कार्यक्रम
हाडांच्या व्यापाऱ्यानं भूतदया सांगावी तसे.

असलेल्यांचे असलेले राखणारी
अन् सत्तेच्या काठीला प्रलोभनाची गाजरे लटकावून
नसलेल्यांना नुसतीच झुलवत ठेवणारी
घोषणाबाज सरकारे,

संदर्भहीन उदात्तांची निष्काम स्वप्ने पाहणाऱ्या
इतिहासबद्ध संघटना,
आदर्शांची शाब्दिक कुतरओढ करणारे
शब्दबंबाळ विचारवंत,
अन् मरणासाठी दक्षिणायन संपण्याची वाट पाहत
शरपंजरी पडलेले सारे इझम्स ;

कुठे आहे निर्माणाचं आव्हान ?
हे तर आहे केवळ थकलेल्या पंखांचे मूक फडफडणे.

लांब पल्ल्यांचे पंख घेऊन येणाऱ्यांच्या माथी आले
वर्तमानाची वेस न ओलांडणारे
अन् भविष्याच्या सीमेवरच कोसळणारे
मरगळल्या मेंदूचे गलितगात्र मार्गदर्शन !

या साऱ्याच्या विरोधात षंढ येतील
शांततेचे लढे हाकारीत नेणारे युवकांचे तांडे
डोक्यावर केसांचे जंगल वाढवून
अन् अभावात अस्तित्व झाकून
एक जत्था हिप्पींचा निघाला होता
पण त्या नकारवीरांचे अभावपूजन
कोपऱ्यातूनच राहील वळवळत
कारण विज्ञानासारखीच विस्तारणारी असतात
क्षितिजं जीवनाचीही

ज्ञानासारखेच समाजशीलतेलाही असह्य होतात
निवांताचे अभाव–प्रदेश
अन् साऱ्याच दिशांनी भरून निघते
तरुण जीवनाचे प्रलयंकारी तांडव

जग जागले आहे
ते पोहचले आहे नव्या वास्तवाच्या उंबरठ्यावर

या वास्तवात आहे सामान्यांचा समर्थ समाज
दुबळे समाज दुबळ्या शरीरासारखेच असतात समर्थावलंबी
समर्थ समाजाचे नुसते परावलंबनच संपत नाही
नेतृत्वावलंबनही संपते.
म्हणूनच प्रगतिशील समाजात येत असते
आपल्या महापुरुषाबाबत आक्रमक कृतघ्नता
या शतकातल्या सगळ्याच महापुरुषांचे झाले आहेत
पूजनीय पुतळे,
मार्क्स् अन् गांधीचा–
लेनिन अन् माओचा–
रूझवेल्ट अन् चर्चिलचा लागला निकाल
तिथं स्वयंमन्य महाजनांचे काय ?

म्हणून बाबांनो !
जागणाऱ्या समाजाची समर्थ स्पंदने ध्यानात घ्या.
विसाव्या शतकाची क्षितिजं त्यांच्या हातून तुटणार आहेत
अन् एकविसावं शतक त्यांच्याच कडे–खांद्यावर येणार आहे.

## ती पहाट सोनेरीही असू शकेल

विझत जाणाऱ्या व्यवस्थेविरुद्धचे अटळ बंड
निर्माण–लक्षी असेल आणि श्रमवंत त्याचे नेते असतील
मावळतीच्या रंगात दंगलेले अस्तित्वग्रस्त नसतील
क्षितिजाआडून डोकावणाऱ्या प्रकाशाचे प्रतिनिधी असतील

भूत आणि वर्तमानाचा संदर्भ असला तरी
क्रांतीची दिशा भविष्याची आहे
अन् कुठलेही भविष्य बंदुकांच्या नळ्यातून जन्मत नाही.
त्या नळ्या वर्तमानही राखू शकत नाहीत,
भविष्याचा संबंध विनाशाशी नाही–
निर्मितीशी आहे.
क्रांतीचा चेहरा रक्तानं माखलेला नाही–
घामानं डवरलेला आहे.
तिचे नाते सत्तीशी नाही–
मुक्तीशी आहे.
हे भान सुटते तेव्हा–
'एक झालेले जगातले कामगार'
पोलंडच्या कामगारांची सॉलिडॅरिटी फोडायला निघतात.
क्रांतीच्या स्वयंनियुक्त राखणदारांना मग
आपल्या पोलादी वजनाखाली चिरडून जाणाऱ्या क्रांतीच्या
पिलांची दखल नसते.

अन् क्रांतीच्या अग्निकुंडातले निवलेलं भस्म
आपल्या दगडी माथ्यावर मिरवण्याखेरीज त्यांना काही
जमणारेही नसते.

पैशांच्या खणखणाटात बुडवून टाकलेला जीवनाचा अर्थ
खोपटातल्या नीरवात तेवणाऱ्या दिव्यातून लुकलुकतो;
प्रचंड भुकेएवढा ज्वलज्जहाल होतो,
दारिद्र्याएवढा दाहक होतो,
मेहनतीएवढा दृढ अन् अश्रूसारखा प्रवाही होतो;
हडकुळ्या शरीराएवढा काटक अन् घर्मबिंदूएवढा पराक्रमी होतो,
दु:खाएवढा सनातन अन् स्वप्नांएवढा सत्य होतो !

व्यथांनाच येतो स्वप्नांचा मोहर.
इथं व्यथाच भरून उरल्या आहेत, त्या ईश्वरासारख्या
हे विश्व व्यापून उरणार आहेत आता आमचीच निर्माणस्वप्ने
स्वप्नांचे महाल प्रत्यक्षात आणणे आम्हालाच ठाऊक आहे
आजवर तुमच्या स्वप्नांचे महाल बांधले;
( आणि हातही तोडून दिले तुमच्या लहरीखातर )
आता आमची स्वप्नं जागी झाली आहेत.
श्रमिकांच्या शोषणातून समृद्धी येते
आणि म्हणून संपत्ती ही चोरी आहे.
अन् ही समृद्धी तिच्या निर्मात्यांच्या स्वाधीन करणं,
हीच क्रांती आहे असं तो महाकवी म्हणाला–
त्याच्या धूर्त अनुयायांनी त्या संदेशाचीच बनवली
एक धुंद नशा.
या नशेतले स्वप्नमार्गीच झाले नव्या गुलामगिरीत दाखल
हातापायात तत्त्वज्ञानाचे साखळदंड अडकवून
पोलाद आणि बांबूच्या हवाबंद पडद्याआड
सावधान–
संदेशाच्या संमोहनातून बाहेर पडणारी डोकी

तिथं हातोड्यानं ठेचली जातात.
ड्युबचेक बुटांची कातडी कमावतात
अन् जिलास् तुरुंगातले आयुष्य मोजत असतात.
माणसाला ओढून नेणारा कलकत्त्यातला रिक्षावाला
माणूस नसतो.
' आधा आदमी ' अन् ' आधा जानवर ' असतो.
गांधीचं नाव सांगून कल्याणांची स्वप्न देणारे
अन् मार्क्सच्या नावानं सत्तेवर येणारे सारेच
त्याचं हे अर्धवट माणूसपण कायम राखत
सत्ता सांभाळत असतात.
गांधीचं नाव घेत श्रमप्रतिष्ठेचा जप करणारे पाहिले
अन् मार्क्सच्या नावानं कामगारांचं राज्य आणू म्हणणारेही पाहिले
आणखी पाहिले आमच्या लढ्यावर आपलं नेतृत्व भाजून घेणारे
आमच्याच शत्रूंशी स्वीट–हार्ट समझोते करणारे बेईमान नेते.

" माणसांना माणसांची दुःख असावी,
जनावरांची नसावी.
भूक हे जनावराच्या पातळीवरचं दुःख आहे."

नवी स्वप्नं अन् नव्या संकल्पनांच्या माणुसकीचं क्षितिज
दूर ठेवत हे इथं उभारताहेत
भुकेच्याच भांडवलावर राजकारणांचे उद्योग
अन् गुंतवताहेत
आदमखोर जनावरांसारखी वाढीव वेतनालाच चटावलेली
अर्थखोर माणसं.
क्रांतीची तत्त्वज्ञानं नुसतीच टिकटिकताहेत
रणांगणात मरून पडलेल्या सोजीराच्या निर्जीव मनगटावरच्या
घड्याळासारखी
कधीच्याच निवल्या आहेत प्रेरणा
आता उडते ती तिच्या राखेची धूळ

वर्तमानपत्रातले वक्तव्यांचे रकाने झाकणारी.
'श्रम एव जयते'चा नारा देणारांनो !
वेतनवाढीच्या लोभानं अस्वल नाचवणारे हे दरवेशी
ज्याच्या गडगडाटाने थरकाप उडावा
त्या डमरूंना स्वार्थाचा साज चढवून
स्वैराचाराचं तुणतुणं वाजवणारे हे गोंधळी,
अन् पक्षीय राजकारणाचे झेंडे धरायला
कामगार–संघटना बांधणारे निवडणूक–बाज मदारी
आम्ही आता ओळखले आहेत.
दैन्याचा दर्या ओलांडायचा तर
डबक्यातल्या समाधानाचे स्वप्न देणारे
स्विमिंग–पूल स्पेशालिस्ट
आता पुरे पडणारे नाही.
भूलथापांची पेरणी करणारे
अन् खोट्या आश्वासनांचा कोवळा चारा दाखवणारांना
आता खपवून घेतले जाणार नाही.

अमेरिकेच्या गव्हावर जगणारांना अन् जर्मन तंत्रावर
उद्योग उभारणारांना बजावायचे आहे—
क्रान्तीचे नाते निर्मितीशी असेल
तर निर्मितीचे पाय बांधणारी सार्वजनिक मालकी
क्रान्तीची कसोटी ठरू शकणार नाही.
डुक्कर भाजायला कुणी खोपटं पेटवत नाही
अन् भांडवलदारी भाजायला राष्ट्राच्या सर्वस्वाचा
होम करावा लागत नाही.
श्रमजीवींचे नियंत्रण ही आता प्रेरणा असेल,
आणि निर्मात्यांची मालकी ही दिशा असेल.

इंद्रधनुष्य हाती धरून त्याचे रंग फळाफुलांना देणारा
आता जागा झाला आहे वसुंधरेचा पुत्र !

अन् धुरांड्यांची सोबत करून
त्याच रंगांनी तुमची संस्कृती सजवणारा
जागला आहे श्रमवंतदेखील.
श्रमिकांच्या रक्तानं आपले बावटे रंगवून घेणाऱ्यांनो
लक्षात ठेवा–
मावळत्या सूर्याचाही रंग लालच असतो
उद्याचा सूर्य क्रांतीचा प्रकाश आणील
ती पहाट लालच असेल असं नाही
तिची कांती सोनेरीही असू शकेल....

## गांधीला पर्याय नाही

आजवरच्या प्रत्येक क्रांतीनं आपलीच पिल्लं खाल्ली आहेत;
क्रान्तीचं कंकण बांधलेल्या स्वप्नवेड्यांनो
लक्षात घ्या !
उद्याच्या गिलोटनची पाती
तुमच्याच रक्तानं रंगायचा धोका आहे.

काळोखाचे कण्हणे नव्हे
अभावाचा आक्रोश नव्हे
स्वप्नांचा हुंकारही नव्हे
शतकांचे अक्षांश–रेखांश दोस्त हो,
तुडवीत आले आहेत हे शब्द !

क्रांतीचे नाते विनाशाशी नाही–
निर्मितीशी आहे.
तिचा चेहरा रक्तानं माखलेला नाही–
घामानं डवरला आहे.
घामांच्या धारांनी पाठीवर कोरलेला ओला क्रूस
हे राष्ट्राच्या उत्थानाचं आश्वासन आहे !

भांडवलशाहीनं श्रमिकांचं शोषण चाखल्याच्या
घोषणा निस्तेज झाल्या,
वर्गयुद्धाची धार बोथट झाली,

सॉलिडॅरिटीची टाळू फोडायला निघालेल्या
कामगारशाह्यांचे लपवायचे मुखवटेही सर्वपरिचित झाले.

खेड्यांच्या चाललेल्या शहरी शोषणाविरुद्धचा
माओचा संताप
त्याच्याच कबरीत गाडला गेला आहे
आणि भांडवलशहांच्या सुगंधी मिठीतल्या
त्यांच्या मश्गुल वंशजांना
कल्चरल रेव्होल्यूशनहून मिनीस्कर्ट–रेव्होल्यूशनं
आकर्षक वाटू लागली आहे.

नकारात्मक आव्हानं समर्थ वाटली तरी अल्पजीवी असतात–
विधायक चळवळ दुबळी दिसली तरी चिरंतनाचा स्पर्श घेऊन येते !
गांधी म्हणाला–
'खेड्यांचे शोषण संपवायचे तर–
ती स्वावलंबी करा
ग्रामलक्ष्मीची पूजा करा.'

इन्स्टन्ट क्रान्तिवाल्यांना कॉन्स्टंट क्रांतीतली रचना पेलणारी नाही
अन् रक्ताला चटावलेल्या महाभागांना
रक्त सांडण्याहून रक्त सांधणे मोठे
हे मानवणारे नाही !

वारुळातून बाहेर पडणाऱ्या 'क्यू' बद्ध मुंग्यांसारखे
शहरी कामगारांचे संघटित मोर्चे
सत्तामत्तांना कधी करतात बेजार
आणि मिळवतात साखरदाण्याएवढे
विरघळून जाणारे अल्पजीवी समाधान.
(म्हणूनच प्रेरणाहीन अल्पसंतुष्टांच्या संघटना
'सामंत' शाहीच्या एकाच झटक्यात लोळागोळा होऊन जातात.)
मात्र मुंग्यांना भान नसते

आपण आयत्याच बनवलेल्या वारुळात
वस्तीला येणाऱ्या सापांचे !

झाडाझाडातून वस्तीला असणारे चिमण्यांचे विस्कळीत थवे
घरटी बांधतात, शेणाची अन् मेणाची.
पारावर बसून चिलमी गप्पा करणाऱ्या
खेड्यातल्या कामकऱ्यांसारख्या त्यांच्याही दिसतात रांगा–
विजेच्या तारावर बसलेल्या पाखरांसारख्या
रोजगारहमीचे दाणे टिपून स्थिरावलेल्या;
क्षितिजावर दिसणाऱ्या बगळ्यांच्या माळेसारख्या.
कधी दिसतात त्यांच्याही पलटणी
पण वर्तुळात फिरवणारांची झेप
आकाशाला गवसणी घालू शकत नाही
अन् विस्कळितांचे जमाव
क्रान्तीचे सैनिक ठरू शकत नाहीत.

भुकेल्या पोटांना कान नसतात
रिकाम्या घरांना जाणिवा नसतात.
विवेकाचा हुंकार ऐकायला पोटं भरली असावी लागतात;
संवेदना जागायला घरं जिवंत असावी लागतात.

श्रमवंताचं जग श्रीमंत व्हायचं तर
मधमाशांचे मोहोळ उठावे
तशी माणसं उठावी लागतील;
या माणसांना उत्थान–फुलांची ओढ लावायला
स्वतःला पोळ्यात बंदिस्त करून घेणाऱ्या राणी–माशीसारखे
आयुष्य बांधून घेणाऱ्या प्रेरणा त्यांच्यात उतराव्या लागतील.
शत्रूला शिव्या देऊन सैन्य सावरता येत नाही
आणि लोकानुनयातून लोकजागरण साधता येत नाही.
करुणेचे सुस्कारे क्रांती घडवत नाहीत;

भीकेचे उदात्त तत्त्वज्ञान ते जन्माला घालतात
आणि अनुदानाचे राजकारण स्वाभिमानी समाज निर्माण करीत नाही,
तर आशाळभूत लाचारांचे तांडे ते उभे करीत असते.

गांधी म्हणाला,
उद्दिष्ट पुढे चालवत न्या
मूल्यांचे नुसते अधिष्ठान असून भागणार नाही;
प्रेरणाही मूल्यांचीच असावी लागेल
ती अर्थाच्या प्रेरणेहून प्रबळ असेल
आणि प्रचंड अर्थोत्पादनाकडेही नेणारी असेल.

नुसता निषेध नपुंसक असतो
विधायक कार्याच्या उपासनेतून निषेधाची ताकद वाढत असते
रचनेवाचून होणारी क्रांती हे विनाशाला निमंत्रण असते
आणि रचनेच्या कार्यक्रमाला क्रांतीच्या बिरुदाची गरज नसते.

घर ही दगडविटांची जुळवणी नव्हे;
ती एक जिवंत अभिव्यक्ती आहे.
कारखाना ही निर्जीव यंत्राची सजीव माणसांशी सांगड नव्हे;
श्रमशक्तीच्या उपासनेचं ते केंद्र आहे.
ही दृष्टी असली की,
कारखान्याची धुरांडी तिरस्काराचा धूर सोडीत नाहीत
श्रमवंतांच्या सहजीवनाचा सुगंध त्यातून उसासत असतो.

क्रांतीचं नातं निर्मितीशी असेल तर
निर्मितीचे पाय बांधणारी सार्वजनिक मालकी
क्रांतीची कसोटी ठरू शकणार नाही.
श्रमिकांचे नियंत्रण ही आता प्रेरणा असेल
अन् श्रमजीवींची मालकी ही दिशा असेल.
ॲबिसिनियातल्या सिंहांना कोळ्यांची म्हणे भीती वाटते

कोळिष्टकं बांधणारे किडे संघटित होतात
तेव्हा ते सिंहांना बंदिस्त करतात.
शहरी सडकांच्या कडेनं जागणारे
अन् खेड्यातून जीव बचावून असणारे
सारेच एकत्र यावे लागतील–
त्यांना झुंझवणारांना बाजूला सारून.
या संघटनेचा महामंत्र
मार्क्स् अन् माओजवळ नाही,
त्यांचा वंश सांगणाराजवळही नाही.
सूडाचे तत्त्वज्ञान जग बांधू शकत नाही–
गरिबांचं जग जागवायचं तर
गांधीच्या प्रेरणेला पर्याय नाही !

## नरहर कुरुंदकर

मनाच्या अथांग सरोवरावर उठणारे निळे तरंग
त्यावरल्या शुभ्रश्वेत राजहंसाच्या कमनीय मानेची
विस्तारत, तोडत नेतात आकर्षक बिंबे
पाहता पाहता त्या निळ्या चित्रफलकावर
उठतात लक्ष लक्ष प्रतिमा !
–तसे चित्र मनात आहे
पण मित्रा,
प्रतिमेतल्या त्या लक्ष राजहंसांचे पंख
निवले, विझले आहेत;
तुझे अग्निपंख आता कुठून आणू ?

मृत्यूच्या पंखांची सावली तर माझ्यावर पडली होती
तशात मी म्हणालो,
" वेड्या, वर्तमानाच्या फार पुढं धावू नकोस "
बघ, आता आम्ही किती मागं राहिलो ?

काचेच्या भिंगातून होणाऱ्या सूर्यकिरणांच्या
टोकदार केंद्रीकरणासारखी तुझी प्रज्ञा
तीक्ष्ण वेध घ्यायची विषयांचा;
अन् विवेकानं चेतवलेला तुझा सामर्थ्यवान् अहम्
पिंजून काढायचा सारे विषय.
प्रमेयांची सिद्धी–प्रक्रिया तुझ्या एवढ्या स्पष्टतेनं
आता तरुणांपुढं कोण ठेवणार ?

शब्दांचे फुगवटे वाढवणारे
खूप आहेत शब्दसम्राट
पण आता कोण दाखवणार त्या जिप्सी जादूगारणीसारखे
विषयाच्या लखलखीत कांचगोळ्यात
आशयाचे इन्द्रधनुष्य ?

विचारांचे जवाहिरे दीपवून टाकायचे
जवळच्या रत्नखचित जडावांनी.
पण विषयाचे लचके तोडणारा
तुझ्या प्रज्ञेचा तीक्ष्ण दात
त्या जडावांहून मौल्यवान होता,
अन् त्या दातांआडची चौकस जीभ
न भागणारी तहान लेवून होती.

वास्तवाच्या जाणिवांना वाचा यावी
तसं बोलायचास,
प्रज्ञेच्या दाहक हुंकारासारखा !
काळोख उजळत येणाऱ्या किरणासारखा यायचा तुझा शब्द
नीतीच्या वाटा प्रकाशत–
आयुष्यांचे अर्थ दाखवत.
त्यातून दिसायचे नवे प्रश्न, नव्या दिशा
कुणाला गवसायचा प्रकाश, कुणाला संधी,
तर कुणाला सापडायचे ते स्वतःच.

बोलण्यात शब्दांची आतषबाजीही असायची
( त्यातल्या ठिणग्यांनी अनेकांना भाजल्यासारखेही व्हायचे )
त्यात होतं,
जुगारी माणसाचं झोकून देणारं साहस
पटाईत कुस्तीगीराचे समयज्ञ डावपेच
श्रोत्यांच्या मन–मेंदूत उठणारे तरंग टिपण्याचं संवेदनशील कसब
अन् या साऱ्यात साधलेलं सभ्यतेचं संतुलन.

म्हणून तुझा शब्द जागवायचा तरुणाईत सर्जनशील तणाव
अन् त्या शब्दांचा व्रणही अंकुरित व्हायचा
आपल्या इवल्या टोकांवर तोलत
उद्याच्या स्वप्नांचे आकाश.
झोक्यावरून झुलणाऱ्या सर्कस-सुंदरींच्या सहजतेनं
झेपावायचास संस्कृतींच्या उच्चतर शिखरांवरून
अन् कधी आपल्या विज्ञान-पंखांनी भरारी घ्यायचास
शतकांची ग्लानी दूर करणारी.
त्या खेळानं दीपलेलं प्रेक्षागार भानावर येऊन
करायचं टाळ्यांचा कडकडाट
तेव्हा त्या रसिकतेची त्याच डौलदार सुंदरींच्या
नम्र नखऱ्यानं हसून घ्यायचास दाद !
तुझ्या गळ्यात तेव्हा दिसायचे
पारितोषिकांच्या मोत्यांचे अदृश्य सर.

मित्रा, तुझ्या गतिमान प्रज्ञेला वाचनाचे व्यसन होते,
तर्कशुद्ध अन् प्रयोगसिद्ध प्रमेयांचा ध्यास होता
म्हणून राजकारणाच्या सर्कशीतलं
ताणल्या तारावर चालायचं यंत्र तुला जमलं नाही.
ते सोयसंगत अन् आत्मविसंगत संतुलन
तुला साधणारं नव्हतंच !
त्या प्रयत्नात तोलही गेला अन् तारही गेली
मग समन्वयाचं संतुलन पहायला सोकावलेल्या
प्रेक्षकांच्या वर्गातून आवई उठली-
पावलं चुकीची पडल्याची.
इथं आम्हाला अन्याय-अत्याचारांशी
यशस्वी समझोते पाहण्याची सवय आहे.

सारेच गुलाम आहेत राजकीय वस्त्रागारांचे
वेगवेगळ्या रंगांची अन् "आय्" पासून "यू" पर्यंतची

लेबलं असणारी शौकीन वस्त्र आहेत इथं.
कलबात जातांनाचे पातळ वेगळे,
अन् हळदी–कुंकू करतांनाचे वेगळे.
या वस्त्राग्रस्तांच्या जमातीत
माणूसकीच्या मंत्रद्रष्ट्यांचे जे व्हायचे
तेच तुझे झाले
सगळ्याच वेड्यांनी एकमतानं डॉक्टरला वेडा ठरवावे
तसे आम्ही तुला वेडे ठरवले
अन् मग तुला बदडून काढायला उचलल्या वाचाळ लेखण्या !

माझ्या स्वप्नांच्या ओसाड किनाऱ्यावर
तुझ्या प्रेमाची भरती आली
तेव्हा खूप उशीर झाला होता.
म्हणालास, " हे महारोगी, ही रुग्णसेवा.
हे आहे सारं साधनमात्र !
जे इथं थांबतील ते धुक्याच्या पडद्यापाशीच राहतील
जे आत घुसतील माझ्यासारखे
त्यांना दिसेल तुझ्या चेतनांचा उदात्त स्वार्थ
अन् तू चालवलेली प्रकाश–साधना."
आपले नास्तिक्य गर्जून सांगितलेस
पण दोस्ता ! तुझे आस्तिक होणे मला कळले होते.

कारण एकदा, फक्त एकदाच तुला घायाळ झालेलं मी पाहिले
तेव्हा तुझ्या श्रद्धा जखमी झाल्या होत्या.
आणखी एकदा तू गोंधळलास
तेव्हा मीही व्यथित झालो–
मौलिक उद्दिष्ट्ये अन् करंटी माणसे
की करंटी उद्दिष्ट्ये अन् मौलिक माणसे
या वादात तुझ्यातल्या विवेकाला तोतरेपण आलेलं पाहून !

म्हणून तुझा शब्द जागवायचा तरुणाईत सर्जनशील तणाव
अन् त्या शब्दांचा व्रणही अंकुरित व्हायचा
आपल्या इवल्या टोकांवर तोलत
उद्याच्या स्वप्नांचे आकाश.
झोक्यावरून झुलणाऱ्या सर्कस–सुंदरींच्या सहजतेनं
झेपावायचास संस्कृतींच्या उच्चतर शिखरांवरून
अन् कधी आपल्या विज्ञान–पंखांनी भरारी घ्यायचास
शतकांची ग्लानी दूर करणारी.
त्या खेळानं दीपलेलं प्रेक्षागार भानावर येऊन
करायचं टाळ्यांचा कडकडाट
तेव्हा त्या रसिकतेची त्याच डौलदार सुंदरींच्या
नम्र नखऱ्यानं हसून घ्यायचास दाद !
तुझ्या गळ्यात तेव्हा दिसायचे
पारितोषिकांच्या मोत्यांचे अदृश्य सर.

मित्रा, तुझ्या गतिमान प्रज्ञेला वाचनाचे व्यसन होते,
तर्कशुद्ध अन् प्रयोगसिद्ध प्रमेयांचा ध्यास होता
म्हणून राजकारणाच्या सर्कशीतलं
ताणल्या तारावर चालायचं यंत्र तुला जमलं नाही.
ते सोयसंगत अन् आत्मविसंगत संतुलन
तुला साधणारं नव्हतंच !
त्या प्रयत्नात तोलही गेला अन् तारही गेली
मग समन्वयाचं संतुलन पहायला सोकावलेल्या
प्रेक्षकांच्या वर्गातून आवई उठली–
पावलं चुकीची पडल्याची.
इथं आम्हाला अन्याय–अत्याचारांशी
यशस्वी समझोते पाहण्याची सवय आहे.

सारेच गुलाम आहेत राजकीय वस्त्रागारांचे
वेगवेगळ्या रंगांची अन् " आय् " पासून " यू " पर्यंतची

लेबलं असणारी शौकीन वस्त्र आहेत इथं.
क्लबात जातांनाचे पातळ वेगळे,
अन् हळदी-कुंकू करतांनाचे वेगळे.
या वस्त्राग्रस्तांच्या जमातीत
माणूसकीच्या मंत्रद्रष्ट्यांचे जे व्हायचे
तेच तुझे झाले
सगळ्याच वेड्यांनी एकमतानं डॉक्टरला वेडा ठरवावे
तसे आम्ही तुला वेडे ठरवले
अन् मग तुला बदडून काढायला उचलल्या वाचाळ लेखण्या !

माझ्या स्वप्नांच्या ओसाड किनाऱ्यावर
तुझ्या प्रेमाची भरती आली
तेव्हा खूप उशीर झाला होता.
म्हणालास, " हे महारोगी, ही रुग्णसेवा.
हे आहे सारं साधनमात्र !
जे इथं थांबतील ते धुक्याच्या पड्यापाशीच राहतील
जे आत घुसतील माझ्यासारखे
त्यांना दिसेल तुझ्या चेतनांचा उदात्त स्वार्थ
अन् तू चालवलेली प्रकाश-साधना."
आपले नास्तिक्य गर्जून सांगितलेस
पण दोस्ता ! तुझे आस्तिक होणे मला कळले होते.

कारण एकदा, फक्त एकदाच तुला घायाळ झालेलं मी पाहिले
तेव्हा तुझ्या श्रद्धा जखमी झाल्या होत्या.
आणखी एकदा तू गोंधळलास
तेव्हा मीही व्यथित झालो-
मौलिक उद्दिष्ट्ये अन् करंटी माणसे
की करंटी उद्दिष्ट्ये अन् मौलिक माणसे
या वादात तुझ्यातल्या विवेकाला तोतरेपण आलेलं पाहून !

पौर्णिमेसारखीच येते अमावास्याही अटळपणे
पण दोस्ता, आपल्या वाट्याला आलेल्या
अमावस्येच्या रात्रीही अंधाऱ्या नव्हत्या.
अरे ! असल्या रात्रीच दाखवतात मैत्रीचे दूरस्थ ग्रहतारे
काळ्या ढगांच्या किनारीच लेवून असतात
प्रकाश-किरणांचे दीप्तिमान गोठ
प्रकाशाची अशी किनारच मला दाखवते
तिच्या पोतात दडलेली काळ्या ढगांची अभागी लेणी.

तू राहायला हवं होतंस
तुझे काटेरी कंगोरे आता झिजू लागले होते
अन् आतले तुरट आंबटपण गोडवा घेऊ लागले होते.
चर्चेत चव असल्याचं अन् चोथा नसल्याचं,
मतभेदात मैत्री असल्याचं अन् विद्वेष नसल्याचं
सर्वमान्य होत होतं.

तू कसलेली विचारांची शेतं
पहिली वहिली कणसं धरत होती
अन् कणसांच्या कसदार दाण्यात
भरू लागलं होतं टचटचून दूध !
त्या दुधाच्या मुक्या हाळीनं
झेपावू लागले होते पाखरांचे थवे दाही दिशांनी;
विचारांच्या सुगीचे स्वप्न साकारत असताना
कोसळलास !
ही कविता नव्हे,
श्रद्धांजलीही नव्हे,
माझ्या मुक्या अश्रूंचे दोस्ता,
हे आहे निरोपाचे अभिवादन !

## प्रकाशाची चाहूल देणारी प्रसादपाऊले

ते अजिंक्य महात्म्य माथेफिरू माऱ्यात कोसळले तेव्हा
अंधाराला शाप देणारांच्या गदारोळात
आपल्याच आत्माहुतीनं प्रकाशणारी एक पणती
आम्ही पाहिली तुझ्या हडकुळ्या देहात
अन् अंधारात चाचपडणारांना सापडला
प्रकाशाचा निवारा !

उत्तरेत देश तुटत होता
अन् माणसं मारली जात होती क्रांतीच्या नावानं;
दक्षिणेत तेव्हा ' सबै भूमी गोपाल की ' गात
तू एकटाच निघालास
अध्यात्माचा शिरपाव ल्यालेल्या उपनिषदकालीन तपस्व्यासारखा
रक्तमांसाचा चिखल तुडवीत
हरवलेल्या माणूसकीचे तुटके धागे शोधून
फाटले आकाश शिवत, सांधत,
फाटक्या बरगड्यात साहसाचं तुफान सावरत
हिंसेच्या थैमानातून चालू लागलास—
तेव्हा पाहिली आम्ही,
तुझ्या दुबळ्या पावलात अपराभवी जिद्द
आणि अस्मान–स्वप्नात ईश्वरी निष्ठा !

पौर्णिमेसारखीच येते अमावास्याही अटळपणे
पण दोस्ता, आपल्या वाट्याला आलेल्या
अमावस्येच्या रात्रीही अंधाऱ्या नव्हत्या.
अरे ! असल्या रात्रीच दाखवतात मैत्रीचे दूरस्थ ग्रहतारे
काळ्या ढगांच्या किनारीच लेवून असतात
प्रकाश–किरणांचे दीप्तिमान गोठ
प्रकाशाची अशी किनारच मला दाखवते
तिच्या पोतात दडलेली काळ्या ढगांची अभागी लेणी.

तू राहायला हवं होतंस
तुझे काटेरी कंगोरे आता झिजू लागले होते
अन् आतले तुरट आंबटपण गोडवा घेऊ लागले होते.
चर्चेत चव असल्याचं अन् चोथा नसल्याचं,
मतभेदात मैत्री असल्याचं अन् विद्वेष नसल्याचं
सर्वमान्य होत होतं.

तू कसलेली विचारांची शेतं
पहिली वहिली कणसं धरत होती
अन् कणसांच्या कसदार दाण्यात
भरू लागलं होतं टचटचून दूध !
त्या दुधाच्या मुक्या हाळीनं
झेपावू लागले होते पाखरांचे थवे दाही दिशांनी;
विचारांच्या सुगीचे स्वप्न साकारत असताना
कोसळलास !
ही कविता नव्हे,
श्रद्धांजलीही नव्हे,
माझ्या मुक्या अश्रूंचे दोस्ता,
हे आहे निरोपाचे अभिवादन !

## प्रकाशाची चाहूल देणारी प्रसादपाऊले

ते अजिंक्य महात्म्य माथेफिरू माऱ्यात कोसळले तेव्हा
अंधाराला शाप देणारांच्या गदारोळात
आपल्याच आत्माहुतीनं प्रकाशणारी एक पणती
आम्ही पाहिली तुझ्या हडकुळ्या देहात
अन् अंधारात चाचपडणारांना सापडला
प्रकाशाचा निवारा !

उत्तरेत देश तुटत होता
अन् माणसं मारली जात होती क्रांतीच्या नावानं;
दक्षिणेत तेव्हा 'सबै भूमी गोपाल की' गात
तू एकटाच निघालास
अध्यात्माचा शिरपाव ल्यालेल्या उपनिषदकालीन तपस्व्यासारखा
रक्तमांसाचा चिखल तुडवीत
हरवलेल्या माणूसकीचे तुटके धागे शोधून
फाटले आकाश शिवत, सांधत,
फाटक्या बरगड्यात साहसाचं तुफान सावरत
हिंसेच्या थैमानातून चालू लागलास—
तेव्हा पाहिली आम्ही,
तुझ्या दुबळ्या पावलात अपराभवी जिद्द
आणि अस्मान-स्वप्नात ईश्वरी निष्ठा !

हसायचास तेव्हा निखारे फुलायचे,
गहिवरायचास तेव्हा फुलं ओघळायची;
विचारात, आचार अन् आशयात समाजप्रवणता होती
सत्छंदात सद्भाव अन् व्यवहारात निर्णायक निर्धार होता
म्हणूनच तुझ्या वचनांची सूत्रं व्हायची
त्यांच्या उच्चारानंही पालवायचे नीतीचे अभिक्रम
अन् गवसायच्या उद्याची क्षितिजं उचलणाऱ्या प्रेरणेच्या तरफा !
प्रवाहाविरुद्ध पोहण्याची त्यांनीच जागवली मुक्त साहसं
त्यांच्या स्पर्शानेच उभवले संभ्रमित क्रांतिवाद्यातले विधायक लोकनायकत्व !

थरथरणाऱ्या दु:खाच्या पाठीवर फिरणारा तुझा स्निग्ध हात
माझ्या पाठीवर फिरवलास तेव्हा
माझ्या यातना धन्य झाल्या
म्हणालास, ' तुझा तूच खरा '

तो एक असला की, वरची शून्ये मिळत जातात–
शंभर, हजार, लाख, कोटी, अब्ज, परार्ध होतात.
प्रभातीचा पहिला किरण होऊन आयुष्यात आलास
मावळतीची सोनेरी उधळणही आज उजळतेय–
माझ्या स्वप्नांच्या पायवाटा !
त्या ऋणांचे हिशेब चुकते करायला
अजून जगायची इच्छा होते; पण
एक विचारू का ?
असंभावाला संभवाच्या कक्षेत आणलेस
अन् संभवातून शक्यतेपर्यंत आलास
शक्यतेतून सर्वमान्य संहितेकडे प्रवास सुरू व्हायचा
तेव्हाच नेमकी कां सुचली
क्षेत्रसंन्यासाची अध्यात्मचैन ?

विचार हा आचाराचा वाटाड्या आहे !
विचार हाच जेव्हा होतो एक उद्योग

तेव्हा उभे राहतात संभ्रमित हॅम्लेटांचे खुळे जत्थे
आणि गोंधळात समता अन् वैफल्यात बंधुता असणाऱ्या समाजातही
हॅम्लेट करुणेचे विषय होतात–
आदराचे मानकरी होत नाहीत !

आदर्श मित्रांच्या ध्येयोदात्त सहजीवनाचं प्रतीक म्हणून
सर्वोदयाचं दिलंस राष्ट्रीय आश्वासन,
तो वृक्ष बहरला, मोहरला,
पण फळला नाही;
–असं कां ?

मातीशी नातं सांगत फिरत होतास
भटक्या ज्ञानकोशासारखा
तेव्हा जनमताचा सिस्मोग्राफ होतास;
सूक्ष्मस्थ झालास
तेव्हा जवळच्या धरणीकंपाचीही दखल न घेण्याएवढ्या
बधीर कां झाल्या तुझ्या सहज संवेदना ?

संतांची अलिप्तता हा सहभाग असतो;
बघ्यांचं अलिप्तपण ही पळवाट असते.
सहभागाच्या संकेताची मुक्ती मागणी डोळ्यात घेऊन
सारा देश तुझ्या दाराशी आला तेव्हा
संतांचा सहभागी आम्ही ओझरता पाहिला–
बघ्यांच्या पळवाटेवर !
तो माझा दृष्टिदोष होता की,
तुझ्या संकेताच्या आशेनं आत्मदहन करणाऱ्या
सूरगावच्या सैनिकाचा दुरपला मृतदेह पाहून
मुके अश्रू ढाळणारा
माझ्या ओल्या नजरेला दिसलेला
स्थितप्रज्ञ खरा होता ?

प्रकाशाची चाहूल देणारी प्रसाद–पाऊलं
भ्रमाच्या परिघावर पडतीलच कशी ?
आपल्या गीता–प्रवचनांतून तूच शिकवलेस
देहयात्रेचे दंडक,
दर्यात झोकून घेणं अन् बंदरांचा आसरा न घेणंही
त्यांनीच शिकवलं;
तर आता सांग,
स्वातंत्र्याच्या खोल जखमेतला शस्त्र–सोहळा
तुझ्यातल्या पहिल्या सत्याग्रह्यानं भागला कसा ?

आता एक अखेरचं,
स्वतःसाठी तर्कशुद्ध डोकं वापरणारा तू
इतरांसाठी कोवळं मन कां वापरत राहिलास ?

प्रश्न खूप झाले
अंधारात चाचपडणाऱ्या साऱ्यांच्या समाधानाची
तू तरी का घ्यावीस जबाबदारी ?
अखेर आरशात दिसणाराचं समाधानचं असतं महत्त्वाचं.
तूच एकदा म्हणालास,
" प्रश्नांसोबत जगू नकोस
उत्तरं शोधत जगता आलं पाहिजे."
माझे प्रश्न राहू दे असेच अनुत्तरित
माझी उत्तरं मीच शोधून काढीन.
( तू असाच चालत रहा तुझ्या विवेकाच्या अगम्य वाटेवरून )
त्या प्रयत्नात कदाचित रुंदावतील
माझ्याच समजुतीच्या कक्षा
शंकांचे ढग निवळतील
अन् मला हवा तो तेजाळ विवेक–सूर्य
दिपवून टाकील माझेच निःशंक मन !

## बांग

मोती उधळतांना सोबतीला आले त्यांना विसरणं शक्य आहे
अश्रू गाळतांना साथीला होते त्यांना कसे विसरायचे ?
पाण्याहून रक्ताचे नाते दाट असेल
पण अश्रूंचे नाते त्याहून घनदाट आहे.

सत्ताधाऱ्यांचा विसर पडतो
ते समाजाचा चेहरा बदलण्याच्या प्रयत्नात असतात
संतांना विसरता येत नाही
ते समाजाचं मन बदलण्याचा प्रयत्न करतात.

साहसाच्या प्रेरणेनं माझं तरुण जीवन
भारून टाकलं तेव्हा
मी नाकारला ' अशक्या 'चा आशयच.
आणि वधस्तंभाआड थरथरणाऱ्या चंद्रबिंबासारखं जीवन
खरे म्हणून स्वीकारले तेव्हा
हाती आलेल्या अंधाराच्या किनारींही
मला प्रकाशाचे दान देऊन गेल्या.

कार्यक्षमतेचं कौतुक होतं
कार्यक्षम माणसं मात्र लोकप्रिय होत नाहीत
कार्याबाबत कठोर होणाऱ्या नजरा मात्र
कार्यकर्त्यांबाबत हळुवार होतात.

बर्फाच्या कठीण स्लॅब्ज्वरून घरंगळत पाण्यासारखे
का जगायचे नुसतेच अस्तित्त्व ?
ते तर घसरतेच आहे सगळ्या अंगांनी ?
अन् अज्ञानातल्या गतितत्त्वांनी ?

दुनियेच्या मयूखान्यात आयुष्यांचे पेले
जीवनाच्या नशेनं भरणारे हे कोण साकी ?
त्यांची स्वप्नं मोठी असतील
पण ती शेअर नाही का करता येणार ?

उदात्ताचा क्षण अवघड असेल
( नव्हे तसा तो नेहमीच असतो
समर्पणाची ओढ लावणारा )
पण त्या क्षणीच शोषून घेता येतात
प्रतिकूलतेतून सामर्थ्याचे चिरंतन स्रोत.

अदृश्याशी संपर्क कसा साधायचा ?
देवाशी बातचीत कशी करायची ?
पण न दिसणाऱ्या मनाशी नाते जोडता येते
अन् न बोलणाऱ्या भावनेशी बात करता येते.
माणूस खरा, माणूसकी खरी
दिसणारा असेल, वा दिसणारी नसेल

आस्वित्झच्या कारावासात
डेथ-चेंबरमधल्या मृत्यूची वाट पाहणारा
एक होता कोल्बे. एकटा. एकाकी.
त्यानं दुसऱ्या एका मरणाराचं मरण मागून घेतलं
त्या मरणाराच्या मागे व्यथित होणारी
खूप चिमणी माणसं होती म्हणून.

एक होता इनाक्षी मियाँ
त्यानं स्वत:चा देह वाघाच्या स्वाधीन केला
एक अनोळखी लाकूडतोड्या जिवंत राहावा म्हणून

कोल्बेला व्हॅटिकननं संत ठरवलं
अन् इनाक्षीमियाँला ओळखणाऱ्या वाघानंच मग
जागचे जागी प्राण टाकला.

भावना कुणाला नसते ?
उमाळे साऱ्यांनाच येतात
पण जे भावनेला देतात रक्ताचे अर्घ्य
अन् मांसाचा हविर्भाग
ते ख्रिस्त अन् गांधी होतात.

त्या आयुष्यांतून उठते
संवेदन अन् साहसाच्या समन्वयाची इंद्रधनुष्यी कमान
अन् त्या कमानीखालून शतकं जातात
माना वाकवून.

सवंग लोकप्रियता समस्येच्या संकेतांशी थांबते
ते प्रश्नांच्या गाभ्याचा वेध घेतात
अव्यभिचारी निष्ठा अन् खरे समर्पण
क्रांतदर्शी नेतृत्वाला जन्म देते
सेनापतींचं धाडस अन् प्रेषितांची प्रज्ञा असणारं नेतृत्वच
इतिहासाला आपल्या कल्पनेतला आकार देते
गर्दीच्या गोंधळात त्यांची गीतं साकारत जातात.

गिरिकंदरातल्या तपश्चर्येत देह झिजवणारे
अन् पंचाग्नी साधनांनी तप करणारे तापसी
आपल्यातला माणूस पराभूत करतात, देवत्वासाठी
अन् सामान्य माणसांचा ताप नाहिसा करण्याचं व्रत
घेतलेले महापुरुष आपलं माणूसपण कायम राखतात, माणूसकीसाठी
प्रत्येक युगातल्या राजकारण अन् समाजकारणाच्या ग्रंथात
नमूद होते त्यांचे कृतिशील भाष्य.

गांधी हिंसेमागे लागता तर नेपोलियन होता
कारण अहिंसेची लढाई त्यानं तेवढ्याच जिद्दीनं लढविली.

लहान होताच येणार नाही
एवढी मोठी आयुष्य घेऊन येणारांचे तसे जगणे
अन् मोठं होताच येणार नाही
एवढी लहान मनं घेऊन येणारांचे कसे जगणे ?

संकटातले जहाज कुणाचेहि असो
त्याला मदत करायची असते
हा समुद्रावरचा न्याय आहे
तो धरतीचा न्याय का होऊ नये ?

नीतीच्या व्यवहारापेक्षा चतुराईचा व्यवहार करणारे
चतुराईचा वापर आपल्या निष्क्रियतेच्या समर्थनासाठी करतात.
नीती हाच ज्यांचा व्यवहार असतो
त्यांचा समकालीनांकडून उपहास होईल
संभ्रमाचे शिल्पकार म्हणून
पण माणसांच्या भवितव्याचे तेच होतात
भाग्यवान भागीदार
त्यांचा साधा कटाक्षही फुलवतो
अनेकांच्या जीवनात आशेची नवी पहाट
अन् तरुण मनात जागवतो तो
आव्हानसिद्ध जाणिवा.

ताऱ्यांच्या असीम वाळवंटात
इबादतीसाठी गुडघे टेकून
उद्याच्या तयारीसाठी जेव्हा ते पढतात नमाज
तेव्हा त्यांच्या शब्दांची बांग
जागवत निघते पुढच्या शतकांनाही.

## प्रवास

आज पुन्हा एक नवे क्षितिज
मी ओलांडले आहे
आणि नवे तारे मला खुणावू लागले आहेत.

प्रत्येक क्षण मी भोगला, जखमेसारखा
खूपदा जगून झाल्याचे म्हणूनच
मला केव्हाचे वाटू लागले आहे.

काळ ही संपत्ती
अन् कृतिशीलता हे जीवन मानले आहे
साऱ्या व्यथांचा उपयोग केला
कालापव्यय तेवढा निरुपयोगी मानला आहे.

एकवार लक्ष्यावर नजर खिळली
की बाकी सारे दिसेनासे होते
अन् संपूर्ण विजयाखेरीज सारे पटेनासे होते.

अंधाराची भीती नव्हती
अंधारात प्रकाश होता
संकटांची धास्ती नव्हती

मनगटात मस्ती होती
एकटा कधीच नव्हतो
माणूसच दैवत होते–

वेदना जाणवली नाही
तीच साधना झाली होती
श्रमाने कधी शिणलो नाही
तोच श्रीराम झाला होता.

## प्रकाशाच्या प्रलयासाठी

मार्क्ससकटचे सारे वाद
काळानं पराभूत केले आहेत
त्यानं नेहमीच सांगितलं,
व्यथा हे नातं अन् सामर्थ्य ही नशा आहे
आणि माणूस संदर्भ नाही
तो साऱ्या अर्थांचा गाभा आहे.

क्रांतीला सत्तेचं आकर्षण हवंच
संघर्षाचं सामर्थ्यही हवं
पण माणूसकीची दिशा हवी
ती नसली तर क्रांतीची होते राजकीय वावधूळ.

मनातले सामर्थ्य धगधगते हवे
अन् माथ्यात भेदक दिग्दर्शन हवे
समस्यांचा वेध घेणारी मग निघतात वादळे
हौतात्म्याचे टिळे लेवून,
उद्याची चिंता कुणाला ?
सर्फरोशीच्या नशेत निघालेल्यांना ?
'कफन'ला खिसे शिवतो कोण ?
ते ओझे वाहील कोण ?

एक स्वप्नवेडी अन् विचारग्रस्त जमात
माझ्या परिचयाची आहे

छातीवर वादांची बिरुदे लेवून मिरवणारी
जुन्या घटपटांना नव्या घटपटांचे
नुसतेच पर्याय देणारी
शिवाय काही आहेत स्वतःच्याच कथेतले नायक
काही मिनिटात वाचून संपविता येणारे.

समाधानाच्या सामान्य सुस्काऱ्यांची ओढ
मला नव्हतीच.

अस्वस्थ करणारी स्मरणं जागवणारांचे आकर्षण होते
एकाच जीवनात खूप आयुष्य घेऊन आलेल्या
बिनतळाच्या अंतराळासारख्या खोल खोल माणसांचे
काळ कोरून काढणाऱ्या कलावंतांचे
स्वतःची सोनेरी भविष्ये सोडून
सभोवतीच्या वर्तमानाची मांडामांड करणारांचे
प्रस्थापित असून विस्थापित झालेल्यांचे
अन् घरदारसंपन्न अनिकेतांचे
प्रलयांशी प्रणय करायला निघालेल्यांचे
अन् प्रकाशाच्या प्रलयांचे स्वप्न पाहणारांचे
त्यासाठी काहीहि कुठेहि अन् केव्हाहि
भोगायला तयार असणारांचे.

व्यथासंपन्न मन व्यक्तिसापेक्ष होत नाही
आणि जाणीवसंपन्न जीवनांना कृतिशीलतेचे
वरदान असते.
परिस्थिती प्रतिकूल असेल
पण निसटता क्षण नेहमीच मोलाचा असतो.

सुरक्षिततेसाठीहि कधी संकटांचा आश्रय घ्यावा लागतो
वादळाचे वेळी किनाराच असुरक्षित होतो
दर्याच्या लाटांचे निमंत्रण तेव्हा
निवाऱ्याचे वचन घेऊन येते.

आपल्या स्वप्नांचे बोट धरून
त्यांना क्षितिजापल्याड फरफटत नेणारी जिद्द
आव्हानांपुढे नमत नाही,
त्यांच्या स्वागतास ती सिद्ध होते
अशा तरुण वादळांची मी वाट पाहात आहे.

'माझं एक स्वप्न आहे'
एवढंच तो पुटपुटला अन् त्याचा कंठ रुद्ध झाला
खूप वेळांनी ते जग जागवणारे शब्द उमटले
'वुई शाल ओव्हरकम'

घराघरातून, शिवार–शेतातून
कारखाने अन् उत्तुंग इमारतीतून
त्याच्या प्रतिध्वनींचे घनदाट अरण्यच उभे झाले.

याच्या अखेरच्या शब्दाहून, त्या आधीची
कंठात दाटलेली त्याची मुकी किंकाळीच
माझा आत्मा भेदून गेली होती.

त्यांचे मुडदे पाडायला वर्तमानाला खुशाल निघू द्या
त्या जिवांना इतिहास नेहमीच न्याय देतो
गुलामाचा वंशज मग,
राष्ट्रीय मुक्तिदिनाचा मानकरी होतो.

ते म्हणतात, जेत्यांचा भूतकाळ गौरवशाली
म्हणून तो इतिहास होतो
जितांसाठी ते नशीब होते
राजकारणी माणसांसाठी मताधिक्य
हा न्यायाचा विषय होतो....
संतांचे बलिदानहि समर्पण होते
अन् ते पुढली शतकं उजळून टाकते.

## वेदनेचे नाते

आतून येणाऱ्या हुंकारांशी प्रामाणिक असणारांनाच
बांधिलकी सांगण्याचा अधिकार आहे
आकाशातून वा वरून येणाऱ्या आज्ञांनी स्वत:ला बांधून घेणारे
बांधील नाहीत; गुलाम आहेत.
स्वातंत्र्याला केवळ विवेकाचीच गुलामी मंजूर आहे.

स्वत:शी बांधिलकी मानणारे जीवन स्वतंत्र आहे
फक्त जीवन स्वत:पुरते मर्यादित नाही
ते सर्वभर, अनादि, अनंत आहे
त्यातल्या एखाद्या क्षणाचा मोह होईलही
पण जीवनाचे नाते हे चिरंतनाचे नाते आहे.

व्यथेचे नाते हे जीवनाचे एक चिरंतन वास्तव आहे
या नात्यानं माणूसकी जिवंत ठेवल्याचं मी अनुभवलं आहे
या नात्यानं सुखांना सुगंध दिला
अन् अंतरांच्या आकाशांना रंग दिला.
ते म्हणतात,
'रक्ताचं नातं पाण्याहून जवळचं आहे.'
मी व्यथेचं नातं साऱ्या नात्यात श्रेष्ठ मानत आलो आहे.
ज्यांच्यासोबत हसलो त्यांना विसरता आलं,
ज्यांचेसोबत अश्रू गाळले त्यांच्या
सोबतच चालत आलो आहे.

धर्मांनी अन् तत्त्वज्ञानांनी माणसं जोडली तशी तोडलीही आहेत.
कत्तलींचे इतिहास त्याला साक्षी आहेत
व्यथेच्या आचेनं मनं जळली तशी जुळलीही आहेत
सगळ्या युद्धांचे शेवट या सत्याचे साक्षीदार आहेत.

' वाल्मीकीच्या शोकाचा श्लोक झाला '
गळ्यात अडकलेल्या हुंदक्याचीच होते म्हणे गझल !
कोकीळ गात नाही, नुसतीच आर्त साद घालतो
सारी कविता मनोव्यथेचंच असते मनोरम दर्शन.

दु:खाची किनार ल्यालेल्या पराक्रमी जीवनाचे
शरयूत समर्पण होते तेव्हा
मातीनं माखलेल्या जगापुढे आकाशाची स्वप्न ठेवणारे
एकाकी महाभाग सुळावर संपविले जातात.
सामान्यांच्या स्वातंत्र्यासाठी नि:शस्त्र लढे जागवणारा माणूस
बंदुकांचा शिकार होतो तेव्हा,
ती आयुष्यं थांबत नाहीत इतिहासात
ती वर्तमानांची सोबत करतात
अन् इतिहास उजळण्याची आश्वासनं देतात.
त्यांच्या यातनांची आव्हानचिन्हे होतात
साऱ्या काळात ती कलावंतांना खुणावत असतात.

बिस्मिल्ला म्हणाले, ' पन्नालाल कि क्या बात हैं,
भगवान कृष्णजी के बाद उन्होनेहिं तो बाँसुरी बजायी है '
सोनाल मानसिंग प्रेक्षकांना म्हणाली,
' मी तुमच्यासाठी नाचत नाही.
आतली आव्हानं शांत करायला नृत्य करते.'

पिढ्यान् पिढ्या, शतकानुशतकं वेरूळ कोरणाऱ्या कलावंतांना
अस्वस्थ प्रेरणा देणारी हीच असतात आव्हानं
एक लाकडाचा क्रूस दोन हजार वर्षे
साऱ्या कलावंतांचे प्रेरणास्थान होतो.

तथागत म्हणाला, ‘ हे जग दु:खानं भरलं आहे ’
अन् मी या व्यथेच्या दुबळ्या धाग्यानं माणसं जोडण्याचा
अट्टाहास धरला.
एक होता उपगुप्त,
अन् त्याच्यावर प्रेम करणारी राजनर्तकी वासवदत्ता.
‘ मी येईन, तुझ्या गरजेच्या क्षणी ’, त्यानं तिला शब्द दिला.
तो आला तेव्हा खूप वर्षं उलटून गेली होती.
महारोगानं सडून गेलेला वासवदत्तेचा देह
वस्तीबाहेर डबक्याच्या कडेला पडला होता.
तो म्हणाला, ‘ मी आलो, तुला दिलेल्या शब्दाप्रमाणं ’
ज्यांना वेदना खुणावते त्यांची महाकाव्यं होतात
त्यांची जीवनं चितारणारे वाल्मीकी अन् व्यास होतात
अँजेलो अन् व्हिन्सी होतात
अन् ती कला अमर होते
तिच्या विषयांसारखीच !

एक डेमियन महारोग्यांच्या वस्तीत ख्रिस्ताचा संदेश नेतो,
अन् त्या वस्तीतला रोगी होऊन तिथंच देह ठेवतो तेव्हा
तो फक्त सामान्यांनाच प्रेरणा देत नाही;
शतकं उलटून जातात
कलावंतांची प्रतिभा तो पालवीतच असतो.

खाजगी दु:खांच्याही असतात कुरबुरी
त्यांच्याही होतात कथा, कादंबऱ्या
खाजगी प्रश्नांची उत्तरंही त्यात सापडत असावी;
कारण त्यांना लोकप्रियताही लाभते
त्यांचे संदर्भ मात्र लवकर संपुष्टात येतात
महिन्यांची, वर्षांची क्वचित् दशकाची मर्यादा त्यांना पुरेशी होते !

समाजाच्या दु:खांशी नाती सांगणारांना
शतकांची कुंपणं अडवीत नाहीत

ते शब्द कुरवाळत नाहीत अन्
खाजगी व्यथा गोंजारत नाहीत.
सभोवतीच्या दु:खांना आव्हान देत येतात
ती घोंघावणारी आयुष्ये
विजांना जन्म देतात
दु:खभरल्या रात्री अन् अंधारली मनं
उजळून लख्ख करतात
पाऊल सावरण्याची नजर देतात
कळवळत जगणाऱ्या जिवांना झोकून घेण्याची प्रेरणा देतात
अन् आपल्यासोबत वर्तमान, भविष्यात वाहून नेतात.

जगाची दु:खे मग जगाची राहात नाहीत
त्यांची खाजगी होतात
अन् त्यांचे खाजगी आयुष्य समाजधन बनून जाते
ही व्याधी शारीरिक अन् मानसिकच नसते
मार्क्स नावाच्या द्रष्ट्याला ती शोषणात दिसली
अन् गांधी नावाच्या कलावंताला पारतंत्र्यात
मग या आयुष्यांच्याच झाल्या भव्यदिव्य कलाकृती
देशकाळाच्या मर्यादा पार करणाऱ्या.

समाजानं स्वत:चे न गाळलेले अश्रू
त्यांच्या डोळ्यातून स्रवू लागतात
समाजही गुंग होऊन जेव्हा त्यांना दाद देतो
तेव्हा ती त्याच्या स्वत:च्याच व्यथेला दिलेली दाद असते
साम्राज्ये संपतात
शेक्सपिअर शिल्लक राहतो.

खूप खूप दु:ख बाकी आहेत
त्यांचेशी नाती सांगणारी कलावंत मनं हवी आहेत
पापण्यांवर थरथरणाऱ्या मोत्यांचे सौंदर्य पाहू शकणारी

दुःख गोंजारायला नव्हे
हे जग सुंदर बनवायला ती हवी आहेत.

माझ्या निवत्या डोळयात त्या कलावंतांच्या आगमनाची आस आहे.

REFBK-0024354
REFBK-0024354

वसुधा प्रकाशन

...तो क्रूस म्हणूनच माझ्यासाठी
सेवेचं विरामचिन्ह बनला नाही,
जीवनातल्या साऱ्या बेरजांचा
संकेत बनला.
अत्याचाराचं प्रतीक बनला नाही,
करुणेचा कळस बनला.